

पनवेल : मुसळधार पावसामुळे आपटा गावात पुराचे पाणी शिरले. (छाया : बी.एस. कुलकर्णी)

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३४८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, ६ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

मुसळधार पावसाने नागोठणे जलमय/२
कर्जतमध्ये साकव, पुलांसह घरांमध्ये शिरले पाणी/५
मुरूडमध्ये तुफान पाऊस; भातशेतीही पाण्याखाली/७

# रायगड जिल्ह्यात धुवाँधार पर्जन्यवृष्टी

## जिकडे तिकडे पाणीच पाणी! शाळा-कॉलेजना सुटी जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाचा कहर सुरूच आहे. शुक्रवारपासून मुसळधार पाऊस पडत असून सलग पाच दिवस रायगडकरांना सूर्यदर्शन झालेले नाही. जिल्ह्यात रविवारी (दि.५) सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये सरासरी २१५.४५ मिलीमीटर पाऊस झाला. या पावसामुळे अनेक मार्गांवर तसेच लोकवस्तीत पाणी शिरून जनजीवनावर परिणाम झाला. दरम्यान, पावसाची तीव्रता लक्षात घेता जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांना सोमवारी (दि.६) सुटी जाहीर करण्यात आली आहे.



(छाया : जितू शिगवण)

माथेरानमध्ये विक्रमी ४०८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील २८ लघु प्रकल्पांपैकी ११ लघू प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत. जिल्ह्यातील सर्व नद्यांच्या पाण्याची पातळी वाढली. अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली, तर कुंडलिका व पातळगंगा या नद्या इशारा पातळीवर वाहत होत्या. धरण क्षेत्रातदेखील चांगला पाऊस होत आहे. त्यामुळे लघुपाटबंधारे विभागाच्या २८ धरणांपैकी फणसाड, वावा, सुतारवाडी, कोंडगाव, पाभरे, संदेरी, वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, भिलवले ही धरणे पूर्णपणे भरून वाहत आहेत.

शनिवारी रात्रीपासून मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्याला अक्षरशः झोडपून काढले. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भिसेखिंड बसस्टॉपजवळ बाजूच्या कॅनलची पाणी पातळी वाढल्याने तसेच सुकेळी खिंडीत सखल भागात पाणी साठल्याने वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली. अंबा नदीची पातळी वाढल्याने पाली पुलावर पाणी आले. त्यामुळे वाहतूक दोन्ही बाजूने बंद करावी लागली. बाळगंगा नदीची पाणी पातळी वाढल्याने दुरशेत-खरोशी रस्त्यावर पाणी येऊन वाहतूक ठप्प झाली. मुरुड तालुक्यातील ऊसरोली, वाळवटी, आदाड गावाकडे जाणारा रस्ता पाणी आल्याने बंद झाला.

खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील सावरोली ब्रिज जुना मुंबई-पुणे हायवे व एक्सप्रेस वे कनेक्टर रोडवर पाणी आल्याने बंद करण्यात आला आणि वाहतूक खोपोलीमार्गे वळवण्यात आली. अलिबाग तालुक्यातील सहाण पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक थांबवण्यात आली. कर्जत तालुक्यातील नेरळ-कळंब रस्त्यावरील पुलावर पाणी आल्याने वाहतूक थांबवली गेली. नागोठणे-रोहा रस्त्यावरील भिसेखिंड येथे झाड व माती रस्त्यावर आल्याने वाहतूक रोखण्यात आली. भेरव ब्रिजवरून पाणी गेल्यामुळे तेथील वाहतूकही बंद आहे.

कर्जत वावे कोषाणे पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली. अलिबाग तालुक्यातील पाल्हे पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक थांबवली गेली. अलिबाग-मुरूड रस्त्यावर मजगाव येथे झाड पडल्याने वाहतूक बंद झाली. अलिबाग तालुक्यातील रामराज पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद झाली. श्रीवर्धन तालुक्यातील वडवली-बोर्ली रोडवरील शिस्ते गावाजवळ पाणी भरल्याने हा रस्ता बंद करण्यात आला आणि वाहतूक दिवेआगारमार्गे वळविण्यात आली.

पनवेलमध्ये गाढी नदीची पाण्याची पातळी वाढली असल्याने महापालिकने ४३५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. कर्जत तालुक्यातील शेलू येथील केबीके नगरमधील २५ व्यक्तींचे स्थलांतर करण्यात आले. मुरूड तालुक्यातील खारदोडकुले येथील १५ ते १६ घरांमध्ये पाणी शिरल्याने तेथील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. नांदगाव आदिवासीवाडीतील चार घरांमध्ये पावसाच्या पाण्याने जंगलाची माती आली. तेथील १० लोकांना समाजमंदिर व त्यांच्या नातेवाईकांच्या घरी हलविण्यात आले आहे. (पान २ वर..)

### तालुकानिहाय पाऊस (मिलीमीटरमध्ये)

अलिबाग १९६, मुरुड २५८, पेण २६५. पनवेल २८२.२०, उरण १४८, कर्जत २९१, माथेरान ४०८, खालापूर २७४, रोहा १७१, सुधागड २२२, माणगाव १८८, तळा १९२, महाड १२१, पोलादपूर १११, श्रीवर्धन १०२, म्हसळा २१८,
**एकूण पर्जन्यमान ३४४७.२०, सरासरी पर्जन्यमान २१५.४५.**

## एसटी बसमधील प्रवाशांची पुरातून सुटका



**खालापूर, रसायनी, खोपोली : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीला आलेल्या पुरात कर्जत-पेण एसटी बस पुराच्या पाण्यात अडकल्याची घटना सारसई येथे घडली. या बसमधील आठ प्रवाशांची रसायनी पोलिसांनी धाडसी बचाव मोहीम राबवत सुखरूप सुटका केली. प्रवाशांमध्ये ७२ वर्षांच्या आजीचाही समावेश होता. एसटी बस अडकून पडलेल्या ठिकाणी चार फुटांपेक्षा जास्त पाणी वाहत होते. पोलीस पथकाने स्थानिक नागरिक आणि हेल्प फाउंडेशनच्या सदस्यांच्या सहकार्याने बचावकार्य केले. (सविस्तर पान २ वर..)

## पेण खरोशी येथे दरड कोसळली

**पेण : प्रतिनिधी**

जोरदार पावसामुळे पेण तालुक्यातील खरोशी येथील एका घराच्या मागे दरड कोसळून, तर डोलवी येथील एका घरात पाणी शिरून नुकसान झाले आहे.

याशिवाय वळक, दुरशेत व बळवली या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने तिन्ही गावांचा संपर्क तुटला आहे. (सविस्तर पान ५ वर..)



## अंबा नदीला पूर, २८ जणांचे रेस्क्यू

**पाली : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यात अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. नदीला आलेल्या या पुरामुळे रविवारी (दि. ५) वाकण-पाली राज्य महामार्गावर वाकण आणि वजरोली गावाजवळ २८ नागरिक अडकून पडले होते. त्यांना बचाव पथकाने सुखरूप बाहेर काढले.



वजरोली गावाजवळ अंबा नदीच्या किनारी काही बंगल्यांचे बांधकाम सुरू आहे. नदीचे पाणी वाढल्यामुळे या बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी २० मजूर आणि नागरिक अडकून पडले होते. दुसरीकडे वाकण नाक्याजवळ असलेल्या एका हॉटेलमध्ये आठ जण पुराच्या पाण्यात अडकले. पाण्याचा वेढा इतका वेगाने वाढला की, स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्यांना हॉटेलच्या छतावर आसरा घ्यावा लागला. दोन्ही मिळून एकूण २८ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढून सुखरूप ठिकाणी हलवण्यात आले.

## निवडक

### उद्धव ठाकरे यांनी रोज रामरक्षा म्हणावी : मुख्यमंत्री

**चंद्रपूर :** अयोध्येतील रामाच्या चढाव्याच्या कथित चोरी प्रकरणावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधत "उद्धव ठाकरे यांना राम आठवले याचा मला आनंद आहे. त्यांनी रामाचा मार्ग सोडला होता, त्यामुळे त्यांच्या पक्षाची अधोगती झाली. त्यांनी रामाच्या मार्गाने चालले, तर त्यांचे भले होईल. केवळ आजच्या दिवसापुरते नाही, तर त्यांनी रोज रामरक्षा म्हणावी," असा टोला लगावला.

### नवी मुंबईत इमारतीचा भाग कोसळून पादचाऱ्याचा मृत्यू

**नवी मुंबई :** वाशी सेक्टर ११ मधील जुहूगाव परिसरात रविवारी (दि.५) गीता अपार्टमेंट या धोकादायक इमारतीचा काही भाग अचानक कोसळला. या घटनेत रस्त्यावरून जाणाऱ्या एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून महिला किरकोळ जखमी झाली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## महापौर नितीन पाटील यांनी पनवेलच्या पावसाळी परिस्थितीचा घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वत्र पडत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी रविवारी (दि.५) येथील शहरासह विविध प्रभागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी उपायुक्त, संबंधित विभागांचे अधिकारी, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक सुमित झुंजारराव तसेच पवन सोनी उपस्थित होते. पावसामुळे पाणी साचलेल्या ठिकाणांची पाहणी करून नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात येत असल्याचे महापौर पाटील यांनी सांगितले. पाहणीदरम्यान त्यांनी नागरिकांना सतर्क राहण्यास सांगून अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये तसेच प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबांची सुरक्षितता जपावी, असे आवाहनही केले.



## नेरळमध्ये धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ परिसरात मान्सूनचा आनंद घेण्यासाठी आलेल्या १८ वर्षीय तरुणाचा टपालवाडी धबधब्यातील पाण्यात बुडून मृत्यू झाला. आरबीन्यूदीन शेख असे मृत तरुणाचे नाव असून तो खांडा परिसरातील रहिवासी होता.

आरबीन्यूदीन हा दोन मित्रांसह पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आला होता. त्याने धबधब्याच्या पाण्यात उडी घेतली, मात्र खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाला. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने शोधमोहीम राबवून त्याला पाण्याबाहेर काढले व आरोग्य केंद्रात नेले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

## श्रीवर्धनच्या दिघी खाडीत मच्छीमार नौका बुडाली

### तीन खलाशांना फेरीबोटने वाचवले

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी खाडीत मासेमारी करण्यासाठी गेलेली असताना मच्छीमार नौका जोरदार वारे व खराब हवामानामुळे बुडाल्याची घटना रविवारी (दि.५) घडली आहे. या नौकेवर तीन खलाशी होते. ते पाण्यामध्ये पोहत असताना फेरीबोट चालकाने पाहिले व त्याने फेरीबोट फिरवून त्या तिघांनाही वाचवले.

दिघी ते राजपुरी, आगरदंडा या परिसरात मोठी खाडी आहे. सध्या समुद्रातील मासेमारीला बंदी असल्यामुळे काही गरीब मच्छीमार खाडीमध्ये आपली छोटी नौका टाकून मच्छी मिळेल का हे पाहत असतात. अशीच एक नौका मच्छी पकडण्यासाठी दिघी खाडीत गेलेली असताना जोरदार वारे व खराब हवामानामुळे बुडाली. या नौकेवर तीन खलाशी होते.



नौका बुडाल्यानंतर या नौकेवरील तीन खलाशी बराच वेळ पाण्यात पोहत होते. त्यातील एका खलाशाने लाल कानटोपी घातली होती. या टोपीमुळे पोहणारे खलाशी फेरीबोट चालकाच्या लक्षात आले. मग फेरीबोटमधील खलाशांनी हवा भरलेल्या ट्यूब, दोऱ्या पाण्यात टाकून बुडणाऱ्यांना आपल्या बोटीमध्ये घेतले आणि त्यांचे प्राण वाचवले.

## मुंबईमध्ये झाड कोसळून वृद्धाचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे मुंबईत झाड कोसळण्याच्या घटना सुरूच आहेत. रविवारी (दि.५) दुपारी कुर्ला पश्चिम येथील नौपाडा परिसरात दुकानावर झाड कोसळून ६३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. युनूस कुंदावाला (वय ६३) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. ते दुकान उघडण्यासाठी आली असताना झाडाची फांदी कोसळून त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, कुर्ला येथील झाड कोसळून झालेल्या मृत्यूची घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी असल्याची प्रतिक्रिया महापौर ऋतु तावडे यांनी व्यक्त केली. मृताच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर करत या घटनेची चौकशी करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

## माथेरानचा शारलोट लेक ओव्हरफ्लो!

**माथेरान : प्रतिनिधी**

जून महिन्यात वरुणराजाने ओढ घेतल्याने सर्वांनाच त्याची प्रतीक्षा होती. अखेर जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून पावसाला दमदार सुरुवात झाली असून माथेरानचा शारलोट लेक ओव्हरफ्लो होऊन वाहू लागला आहे.

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात येथील डोंगरदऱ्यातून तयार होणारे आणि फेसाळणारे पांढरेशुभ्र धबधबे पर्यटकांना भुरळ घालतात. सध्या पावसाने चांगलाच जोर धरला असून माथेरानमध्ये पावसाळी पर्यटन हंगाम जोरदार सुरू झाला आहे.

पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे नेरळ ते माथेरान रस्त्यावर असणारा धबधबा. या धबधब्यावर मोठ्या संख्येने पर्यटक भिजण्याचा मनसोक्त आनंद लुटतात. त्याचप्रमाणे माथेरानमधील शारलोट लेक येथेही मौज मजा करतात. हा तलाव भरून ओसंडून वाहू लागल्याने पर्यटकांसाठी पर्वणी मानली जात आहे. या ठिकाणी गर्दी होण्याची शक्यता असून प्रशासनालाही करडी नजर ठेवावी लागणार आहे.



## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबुराव तिडके यांचे निधन

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून श्रद्धांजली

**नागपूर : प्रतिनिधी**

विदर्भातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा श्रीराम ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव तिडके साहेब यांचे दीर्घ आजाराने रविवारी (दि. ५) सकाळी निधन झाले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात त्यांचा वावर होता. त्यांच्या निधनाने शोक व्यक्त केला जात आहे.



विदर्भात सहकार चळवळीला चालना देण्यासोबतच ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी बाबुराव तिडके यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदानही मोलाचे आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाबुराव तिडके यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांनी शोकसंदेशात म्हटले आहे की, बाबुरावजी तिडके यांनी नागपूर जिल्ह्याच्या राजकारणाला दिशा देण्याबरोबरच शिक्षण, सहकार आणि समाजकारणाच्या क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या सार्वजनिक जीवनातील एक उमदे, अभ्यासू आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

## शुभेच्छा...



**पनवेल : येथील डॉ. दीपक कुलकर्णी यांच्या माध्यमातून शहरातील अलोक डर्मटॉलॉजी इस्टिट्यूट या नव्या त्वचारोग उपचार केंद्राचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. या निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी तेथे सदिच्छा भेट देत शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत इतर मान्यवर.**

# मुंबई-गोवा महामार्गावर पुराचा विळखा; दोन्ही लेनला कंबरभर पाणी, वाहतूक ठप्प

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. नागोठणे, सुकेळी, वाकण परिसरासह अनेक ठिकाणी महामार्गावर पुराचे पाणी आल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. जणू काही महामार्गांवर समुद्र अवतरला असून उसळणाऱ्या लाटा महामार्गांवर प्रथमच पहावयास मिळत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या या दुरावस्थेला जबाबदार कोण असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. यावेळी वाहतूक कोंडीत अडकलेले लहान बालके, वयोवृद्ध, प्रवाशी, नागरिक जनतेचे अन्न पाण्यावाचून अतोनात हाल झाले. दरम्यान महामार्ग एस पी तिरुपती काकडे यांनी आपल्या टीम सह परिस्थितीची पाहणी केली. व नागरिकांना आवश्यक सूचना दिल्या.

याचवेळी वाकण जवळ एका प्रवासी बस व पीक अप व्हॅनला चिखलात अडकून पडावे लागले असून अनेक लहान-मोठी वाहने महामार्गावर



## धोकादायक प्रवास टाळण्याचे पोलीस प्रशासनाकडून आवाहन

अडकली आहेत. परिणामी तब्बल सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रवासी आणि वाहनचालकांचे मोठे हाल होत आहेत. प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा जोर कायम राहिला. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नद्या धोक्याच्या पातळीच्या वरून वाहत असून नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने पूरस्थिती निर्माण झाली आहे.

या पावसाचा सर्वाधिक फटका मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीला बसला आहे. नागोठणे-वाकण परिसरासह सुकेळी आणि आसपासच्या भागांमध्ये महामार्गावर मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी साचले आहे. काही ठिकाणी पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने वाहतूक मंदावली असून अनेक ठिकाणी ती पूर्णपणे ठप्प झाली आहे.

नागोठणे-वाकण परिसरात रस्त्याच्या कडेला झालेल्या चिखलात एक प्रवासी बस अडकून पडल्याची घटना घडली. बस अडकल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा आणखी वाढला. त्याचबरोबर अनेक खासगी वाहने, मालवाहतूक ट्रक आणि एसटी बसही महामार्गावर अडकून पडल्या आहेत. परिणामी महामार्गावर तब्बल सात किलोमीटरहून अधिक अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असून प्रवाशांना तासनतास प्रतीक्षा करावी लागली.

सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील परिस्थिती गंभीर बनत चालली असून प्रशासनाकडून पूरस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. आपत्ती व्यवस्थापन विभाग, महसूल यंत्रणा, पोलीस प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही तास जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, पूरग्रस्त भागांपासून दूर राहावे तसेच पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून प्रवास करण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## खोपोली सुभाष नगरात दरड कोसळली; नागरिकांत भीती

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील सुभाष नगर या नागरी वस्तीत डोंगराचा काही भाग कोसळल्याने या भागात भेटीचे वातावरण पसरले आहे . गेले चार-पाच दिवस खोपोली शहरात व परिसरात मोठ्या प्रमाणात पावसाची फटकेबाजी सुरू असून, नागरी वस्तीत पाणी शिरल्याने नागरिकात भीतीचे वातावरण आहे.

आजे रविवारी पहाटे पाचच्या सुमारास सुभाष नगर मागील डोंगरावरील मोठ्या प्रमाणात दरड कोसळली, कोसळलेल्या दरडेतील माती जवळच असणाऱ्या तीन घरावर आल्याने नागरिकांनी तात्काळ घराबाहेर पडले. हा भाग दरडग्रस्त असल्याने खोपोली नगरपालिकेतर्फे येथील नागरिकांना याबाबत सतर्क केले होते. तरी नागरिकांनी त्याची गंभीर दखल घेतली नाही. येथील दोन ते तीन घरांजवळ माती आली आहे.

घटनेची माहिती मिळताच खोपोली नगरपालिका, पोलीस प्रशासन, महसूल विभाग. व हेल्थ फाउंडेशन चे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल होऊन मदत कार्यास सुरुवात झाली. घटनेचे गांभीर्य ओळखून नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे,मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील व वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन, तेथील नागरिकांना जवळच्या शाळेत स्थलांतर करण्यात आले त्यांची राहण्याची खाण्याची सोय करून देण्यात आल्याचे नगराध्यक्ष शेंडे यांनी प्रसारमाध्यमांची बोलताना सांगितले.



# ब्लू जेट दुर्घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री निधीतून धनादेशाचे वाटप

## मंत्री भरत गोगावले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश





**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीतील ब्लू जेट कंपनीत ३ नोव्हेंबर २०२३ रोजी झालेल्या भीषण आग दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या ११ कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून विशेष बाब म्हणून प्रत्येकी ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली. हे धनादेश आज महाड प्रांत कार्यालयात रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते उपस्थित वारसांना वितरित करण्यात आले.

या वारसांना कंपनी कडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मंत्री भरत गोगावले यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. यावेळी प्रांताधिकारी पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंत्री भरत गोगावले म्हणाले की, ब्लू जेट कंपनीतील दुर्घटना घडल्यानंतर आपण आणि तत्कालीन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर मृत कामगारांच्या कुटुंबियांना शासनाकडून विशेष आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली होती. तहसीलदारांमार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रस्ताव मंजूर करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. आज उपस्थित वारसांना धनादेश देण्यात आले असून, अनुपस्थित वारसांना प्रांताधिकारी कार्यालयात बोलावून धनादेश सुपूर्द करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

धनादेश स्वीकारणाऱ्या मृत कामगारांच्या वारसांमध्ये गंगामणी विकास महातो, दुर्गा लक्ष्मण मोरे, भीम हजीराम ओरोच, चंचलादेवी जीवनकुमार चौबे, रेखाबाई रविंद्र कोळी, बाळाराम कोंडीराम सुतार, राजश्री सोमनाथ वायदंडे, मेहतुब अकबर शेख, मनीषा संजय पवार, रत्नाबाई दत्तात्रय गुरसणे आणि सविता सतीश साळुंखे यांचा समावेश आहे.

सुमारे अडीच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मिळालेल्या या मदतीमुळे मृत कामगारांच्या कुटुंबियांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. त्यांनी मंत्री गोगावले यांचे आभार मानले

## डॉ. सुभाष वाघमारे, सुनिता वाघमारे यांचा शुक्रवारी सेवापूर्ती सन्मान

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती**

**सातारा : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील मराठी विभागप्रमुख, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषा मंडळाचे प्रभारी संचालक तथा ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. डॉ. सुभाष वाघमारे आणि याच संस्थेच्या जयसिंगराव मल्हारी करपे हायस्कूल, वर्ये (ता. जि. सातारा) येथील मुख्याध्यापिका सुनिता वाघमारे या पती-पत्नीच्या प्रदीर्घ, समर्पित आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवेबद्दल सेवापूर्ती सन्मान व कृतज्ञता समारंभ शुक्रवार, दि. १० जुलै रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला आहे.

या समारंभास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत तसेच पनवेल येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य यशवंत देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (उच्च शिक्षण) डॉ. शिवलिंग मेनकुदळे, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (माध्यमिक) बी. एन. पवार, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्र-कुलसचिव प्रा. डॉ. विजय कुंभार, मध्य विभागाचे विभागीय अधिकारी मा. नवनाथ जगदाळे तसेच सहाय्यक विभागीय अधिकारी दिनेश दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी कॉलेज, साताराचे प्राचार्य तथा रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर डॉ. राजेंद्र मोरे असणार आहेत.

## मुसळधार पावसाने नागोठणे जलमय; अंबा नदीने धोक्याच्या पातळी ओलांडली, जनजीवन विस्कळीत

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्ह्यासह नागोठणे परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे रविवारी नागोठणे शहर अक्षरशः जलमय झाले. नागोठणे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक ठिकाणी पाणी साचल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.



नागोठणे शहरातील कोळीवाडा, एस.टी. स्टँड परिसर, मारिआई मंदिरासमोरील भाग, बाजारपेठ तसेच नुक्कड गल्ली परिसरात पाणी शिरल्याने व्यापारी आणि नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. व्यापारी वर्गाने आपला माल सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी धावपळ केली, तर कोळीवाडा परिसरातील नागरिकांनीही घरातील साहित्य सुरक्षित करण्यासाठी प्रयत्न केले.दरम्यान, पावसामुळे नेहमीचे भाजी मार्केट विस्कळीत झाल्याने कै. तात्यासाहेब टके चौक येथे तात्पुरत्या स्वरूपात भाजी बाजार भरविण्यात आला. त्यामुळे कै. तात्यासाहेब टके चौकात दिवसभर मोठी गर्दी पाहायला मिळाली.

पूरपरिस्थिती लक्षात घेऊन नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली संवेदनशील ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांना सुरक्षिततेच्या सूचना देण्यात येत आहेत.याबाबत नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया महाडिक यांनी सांगितले की, अंबा नदीची पाणीपातळी वाढत असल्याने ग्रामपंचायत प्रशासन पूर्णपणे सज्ज असून सर्व कर्मचारी सतर्क ठेवण्यात आले आहेत. पावसामुळे नागरिकांना उद्‌भवणाऱ्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने होडी सुद्धा तैनात ठेवण्यात आल्याचेही सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांनी स्पष्ट केले.

मुखबरदारीचा उपाय म्हणून दिवसभर वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.वीजपुरवठा बंद असल्याने नागोठणे व परिसरातील गावांना पाणीपुरवठा करणारी जेएसडब्ल्यूची पाईपलाईनही बंद पडली. परिणामी अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

एकीकडे मुसळधार पावसामुळे पूरस्थिती, तर दुसरीकडे वीज व पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागोठणेकरांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. परिस्थिती पूर्ववत होताच वीज आणि पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणा प्रयत्नशील असल्याचे दिसते.

पान १ वरुन

## रायगड जिल्ह्यात धुवाँधार पर्जन्यवृष्टी

कुंडलिका नदीकिनारी बाहे येथे २० युवक नदीची पाणीपातळी वाढल्याने अडकले होते. त्यांना स्थानिक पथकाच्या मदतीने सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले. पनवेल तालुक्यातील सारसई गावाजवळ एसटी बसमधील आठ प्रवासी अडकले होते. त्यांना रसायनी पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने सुखरूप बाहेर काढले.

मुरूड येथे कुमरोटकर यांच्या घराकडे जाण्याच्या रस्त्यावर पाणी आले. भोसलेवाडी येथे काही घरांमध्ये पाणी गेले. शिघ्रे येथील पाच ते सहा घरांमध्ये पाणी शिरले. अलिबाग तालुक्यातील ताजपूर येथील गुरांचा गोठा पडला. फुफादेवीपाडा येथील घरावर झाड पडून अंशतः नुकसान झाले आहे. पेण तालुक्यात दुरशेत येथे घरामध्ये पाणी शिरले. वळक, दुरशेत व बळवली या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने तिन्ही गावांचा संपर्क तुटला आहे. डोलवी येथे एका घराचे अंशतः नुकसान झाले आहे. खरोशी येथे दरड कोसळून घराचे अंशतः नुकसान झाले, तर अंतोरे येथील घरांना पाणी लागले आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील मूळ वेळास येथील घराचे पत्रे उडून नुकसान झाले आहे. वडवली येथील घराची भिंत कोसळून नुकसान झाले. माणगाव तालुक्यात दोन घरे व एक गोठा यांचे अंशतः नुकसान झाले आहे. पनवेल तालुक्यातील पारगाव व पारगाव डुंगी या गावांमध्ये पाणी साचले असून या ठिकाणी सिडकोमार्फत पाण्याचा निचरा करण्यासाठी १० पंप लावण्यात आले आहेत. पळस्पेत तीन घरे, तर पारगाव डुंगी येथे २५ घरांमध्ये पाणी जाऊन नुकसान झाले. माथेरानच्या पंचवटी नगरमध्ये एका घराच्या पत्र्यावर झाड पडून नुकसान झाले आहे.

## एसटी बसमधील प्रवाशांची पुराच्या पाण्यातून सुटका

**खालापूर, खोपोली, रसायनी : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीला आलेल्या पुरात कर्जत रसायनी दांड-पेण मार्गावरील एसटी बस अडकल्याची घटना रविवारी (५ जुलै) सारसई येथे घडली. बसमधील आठ प्रवाशांची रसायनी पोलिसांनी धाडसी बचाव मोहीम राबवत सुखरूप सुटका केली.



पुराचे पाणी रस्त्यावर आल्याने बस अडकून पडली होती.घटनेची माहिती मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल होत मुसळधार पाऊस आणि वाढता पाण्याचा प्रवाह यांची पर्वा न करता पोलिसांनी हेल्प फाउंडेशन, रसायनी सदस्यांच्या सहकार्याने बचावकार्य सुरू केले.नियोजनबद्ध पद्धतीने बसमधील सर्व आठ प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. यामध्ये ७२ वर्षीय ज्येष्ठ महिलेचीही सुखरूप सुटका करण्यात आली. एका पोलीस कर्मचाऱ्याने जेष्ठ महिलेला खांद्यावर घेऊन पुराच्या पाण्यातून सुरक्षितस्थळी आणल्याने उपस्थितांनी पोलिसांच्या धाडसाचे कौतुक केले.बचाव मोहिमेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांच्या प्रकृतीची खातरजमा करण्यात आली. व अन्य पाणी पुरवठा केला.

सुटका झालेल्या प्रवाशांनी आणि स्थानिक नागरिकांनी रसायनी पोलिसांचे आभार व्यक्त केले. दरम्यान, रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पुराचे पाणी असलेल्या रस्ते व पुलांवरून प्रवास टाळावा, प्रशासनाच्या सूचनांचे पालनकरावे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने पोलीसअथवा संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन रसायनी पोलिसांनी केले आहे.

## तळा तालुक्यात भिंत कोसळून ७० कोंबड्या मृत

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात संततधार पडणाऱ्या पावसामुळे शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्या बारपे येथील सचिन जाधव या शेतकऱ्याच्या पोल्ट्रीची रात्री भिंत पडून ७० कोंबड्या मृत झाल्याची घटना घडून शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.पोलिस पाटील कांतीलाल कसबले व ग्रामसेविका सुवर्णा तांबडे यांनी तात्काळ घटनास्थळी जावून पंचनामा केला आहे.

शेतीपुरक व्यवसाय म्हणून पोल्ट्रीचा सचिन जाधव हा व्यवसाय करत होते.या व्यवसायातून त्यांना आर्थिक लाभ चांगला मिळत होता. त्यावरती आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत होते.मात्र गेल्या दोन दिवसात कोसळधार पडणाऱ्या पावसामुळे सदर पोल्ट्रीची भिंत कोसळल्याने यामधे ७० कोंबड्या मृत झाल्याने त्यांचे नुकसान झाले आहे.

# अतिवृष्टीमुळे पनवेल महापालिकेकडून ४३५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन पूर्णपणे अलर्ट मोडवर असून बाधित नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार आतापर्यंत सुमारे ४३५ नागरिकांचे चार तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले असून त्यांना चहा, नाश्ता, जेवण, पिण्याचे पाणी तसेच अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



महापौर नितीन पाटील यांनी पनवेलमधील विविध पाणी साचलेल्या भागांची पाहणी केली. यावेळी महापालिका सदस्य सुमित झुंजारराव व दर्शना भोईर उपस्थित होते. महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाण्याचा निचरा तातडीने करण्याच्या सूचना देतानाच नागरिकांनीही अनावश्यक बाहेर पडणे टाळावे व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले. पाणी साचणाऱ्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आपत्कालीन व्यवस्थापन विभागामार्फत पनवेलमधील पटेल मोहल्ला व कच्ची मोहल्ला परिसरातील भारतनगर झोपडपट्टीतील १४९ नागरिकांना उर्दू शाळेत, २११नागरिकांना कोळीवाडा शाळेत, तर एचओसी कॉलनी आदिवासी वाडीतील ७५ नागरिकांना क्रीडा संकुलात सुरक्षितरीत्या स्थलांतरित करण्यात आले आहे. भांडार विभागामार्फत या सर्व नागरिकांना चहा, बिस्किटे, नाश्ता, पिण्याचे पाणी व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या सूचनेनुसार स्थलांतरित नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

अतिरिक्त आयुक्त, संबंधित उपायुक्त, कामोठे प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी, पनवेल प्रभाग प्रभारी अधिकारी राजेश डोंगरे तसेच मुख्य निरीक्षक अरुण कांबळे हे सातत्याने निवारा केंद्रांना भेट देऊन नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेत आहेत. पाण्याचा निचरा करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना २४ तास सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. सखल भागातील साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी जेटिंग मशिन व जेसीबीच्या सहाय्याने गटारांमधील अडथळे व कचरा हटविण्याचे काम सुरू असून विविध ठिकाणी पाण्याचा जलद निचरा करण्यासाठी कर्मचारी कार्यरत आहेत. चारही प्रभागातील परिस्थितीवर महापालिका प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

### आपत्कालीन यंत्रणा सज्ज!

***अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी ऑनलाईन बैठकीद्वारे आपत्कालीन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी चारही प्रभागांतील पाणी साचलेली ठिकाणे, तेथील उपाययोजना, स्थलांतरित नागरिकांना पुरविण्यात आलेल्या सुविधा याबाबत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत महापालिकेची सर्व यंत्रणा सतत सज्ज ठेवण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले***

खारघर येथील ड्रायव्हिंग रेंज व पांडवकडा मार्ग सुरक्षेच्या दृष्टीने बंद करण्यात आला आहे. या परिसराची अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर आणि प्रभारी अधिकारी जितेंद्र मढवी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी पनवेलमधील बांठिया शाळा, पाणी साचलेले विविध भाग तसेच स्थलांतरित नागरिकांच्या निवारा केंद्रांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच समिती 'क' अंतर्गत कामोठे गणपती मंदिर परिसरात दोन पंपांच्या साहाय्याने रस्त्यावर साचलेल्या पाण्याचा पूर्णपणे निचरा करण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, नगरसेवक समीर ठाकूर यांनी नवीन पनवेल होल्डिंग पॉण्डची पाहणी केली.

प्रभाग समिती क कामोठे सरिता संगम सोसायटी सेक्टर ६, कामोठे येथे चौथ्या मजल्यावर रूम १९चे पीओपी कोसळले होते. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची जीवित व वित्तहानी झालेली नाही तरी सदर सोसायटीस मनपाकडून यापूर्वीच स्ट्रक्चर ऑडिट करणे कामी नोटीस यापूर्वी देण्यात आलेली आहे . सदर ठिकाणची अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरुप खारगे व अभिषेक पराडकर यांनी प्रत्यक्ष पहणी केली व या संदर्भात योग्य ते सूचना केल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी महापालिकेची सर्व यंत्रणा सज्ज असून आवश्यक ते सर्व मदतकार्य सुरू असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी दिली.





# डंपरखाली चिरडून क्लिनरचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खडी भरण्यासाठी आलेल्या एका हायवा डंपर चालकाने कोणताही अंदाज न घेता गाडी रिव्हर्स घेतल्याने डंपरच्या मागच्या चाकाखाली चिरडून क्लिनरचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेलमधील कुंडेवहाळ कातकरीवाडी येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. पनवेल शहर पोलिसांनी डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

शंकर विठोबा इटकर (वय ४०) असे मृत क्लिनरचे नाव असून, तो तुर्भे येथील बोनसरी गावात राहत होता. तो विकास ट्रान्सपोर्ट कंपनीत क्लिनर म्हणून कार्यरत होता. शंकर इटकर हा विकास ट्रान्सपोर्ट कंपनीच्या डंपरसोबत पनवेल येथील कुंडेवहाळ कातकरीवाडी परिसरातील हवील एंटरप्रायझेस स्टोन क्रेशरच्या साईटवर खडी लोड करण्यासाठी गेला होता. खडी लोड झाल्यानंतर डंपर चालक प्रकाश बापू धोत्रे याने डंपर मागे घेण्यास सुरुवात केली. मात्र, मागे स्वतःचा क्लिनर उभा असल्याचा अंदाज न आल्याने शंकर याला डंपरची जोरदार धडक बसली. या धडकेमुळे शंकर खाली पडला आणि डंपरच्या मागील चाकाखाली चिरडला गेला.

त्याला तातडीने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी डंपर चालक प्रकाश बापू धोत्रे याच्याविरोधात निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# एक्सप्रेसमध्ये सापडले पिस्तूल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानकात आलेल्या नांदेडपनवेल एक्सप्रेसमधील जनरल डब्यातील वॉशबेसिनखालील कचरा कुंडीत एक गावठी कट्टा (पिस्तूल) आढळून आल्याने रेल्वे स्थानक परिसरात खळबळ उडाली . पनवेल रेल्वे पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

नांदेडपनवेल एक्सप्रेस (क्रमांक १७६१४) ही गाडी पनवेल रेल्वेस्थानकाच्या फलाट क्रमांक ६ वर आली होती. त्यावेळी जनरल डब्यात अर्जुनकुमार वर्मा (वय ३३) हे सफाई कामगार साफसफाई करत असताना वॉशबेसिनखालील कचराकुंडीत त्यांना एक पिस्तूल दिसून आले. ही माहिती तत्काळ रेल्वे प्रशासन व पोलिसांना देण्यात आली.

त्यानंतर पनवेल रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पिस्तूल ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात ते गावठी कट्टा असल्याचे समोर आले असून ते कोणाचे आहे आणि ते डब्यात कसे आले याचा शोध पोलिस घेत आहेत. या घटनेमुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून रेल्वे पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये तीन दिवसात १०३ झाडे उन्मळून पडली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. पालिकेच्या आकडेवारीनुसार या कालावधीत एकूण १०३ झाडे कोसळली आहेत.विशेष म्हणजे तीन दिवसात पनवेल मध्ये ४२० मिमी पेक्षा जास्त पावसाची नोंद करण्यात आली आहे.

सर्वाधिक फटका सिडकोने वसविलेल्या खारघर, तळोजा आणि नावडे नोडला बसल्याचे आकडेवारी वरून स्पष्ट होत आहे .या भागात ६० झाडे उन्मळून पडली.सिडकोने उभारलेल्या या नोडमध्ये अनेक झाडे अद्यापही मोडकळीस आलेली आहेत.वरवर लावलेली झाडे दररोज उन्मळून पडत आहेत.पनवेल, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरात २५ झाडे कोसळली. कळंबोलीत ११ तर कामोठे येथे ८ झाडे पडल्याची नोंद पालिकेकडे आहे.या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी चार ठिकाणी दुचाकी व चार चाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.सलग पाऊस आणि जमीन मऊ झाल्यामुळे मोठी झाडे मुळासकट उखडून पडत आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावर, पदपथावर आणि वाहनांवर झाडे पडल्याच्या घटना घडल्या. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही मोठी जीवितहानी झालेली नाही. पालिकेने मान्सूनपूर्व काळात ३३९३ धोकादायक झाडांची छाटणी केली होती.

मात्र पाऊस अजूनही कायम असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या रहिवाशांना रस्त्यावर चालताना विशेष काळजी घ्यावी लागत आहे. कोणत्याही क्षणी फांदी किंवा झाड अंगावर पडण्याची भीती असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.पालिकेनेकोसळलेल्या झाडांची तातडीने विल्हेवाट लावण्याचे काम सुरू केले आहे.

> **उन्मळून पडलेली झाडे तत्काळ बाजूला करण्यात आली आहेत.धोकादायक झाडे रहिवाशांच्या निदर्शनास आल्यास तत्काळ पालिकेशी संपर्क साधल्यास त्वरित धोकादायक झाडे हटविण्यात येतील.**
>
> **-स्वरूप खारगे, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**



**पनवेल : शरद ढोमे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त रविवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ढोमे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी अमित जाधव, दत्ता कुऱ्हाडे, संजय कोळी, राजू झांबरे, राजेश सटे उपस्थित होते.**

## निवडक

### ट्रेलरखाली आल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल-मुंब्रा महामार्गावरील तळोजा येथील पेंधर उड्डाणपुलाखाली दुचाकी घसरून पडलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून भरधाव ट्रेलर गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. दिनेश शिंदे (४२) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव असून, ते पनवेल येथील आदई गावात राहत होते. दिनेश शिंदे हे दुचाकीने तळोजा येथून पनवेलकडे जात होते. पनवेलमुंब्रा महामार्गावरील पेंधर उड्डाणपुलाखाली आल्यानंतर त्यांच्या मोटारसायकलचा अचानक ताबा सुटून ती घसरली. त्यामुळे ते रस्त्यावर कोसळले. याचवेळी मागून येणाऱ्या भरधाव ट्रेलरचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघात इतका भीषण होता की, त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### अश्लील चाळे करणाऱ्याला अटक

**पनवेल :** खारघर परिसरातील एका निवासी इमारतीमध्ये सुरक्षेची जबाबदारी असलेल्या सुरक्षा रक्षकानेच आठवर्षीय चिमुरडीसोबत अश्लील चाळे केल्याची घटना उघडकीस आली आहे. खारघर पोलिसांनी याप्रकरणी सूरजकुमार रामजितसिंग (वय ३३) याला अटक केली आहे. सूरजकुमार हा संबंधित इमारतीत सुरक्षा रक्षक म्हणून कामाला होता. त्याच इमारतीतील आठवर्षीय चिमुरडी इमारतीजवळ खेळत असताना त्याने पीडित मुलीसोबत अश्लील चाळे केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर मुलीच्या पालकांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# मटण मार्केटलगत वीज बॉक्स; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**पनवेल :वार्ताहर**

खारघर सेक्टर-१४ मधील पेट्रोल पंपालगत मटण, चिकन आणि मासळी मार्केट परिसरात असलेल्या वीज बॉक्सच्या अगदी शेजारी मटण विक्री व्यवसाय सुरू असल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी मटण शॉपमध्ये गॅस स्टोव्ह वापरून बकऱ्याचे पाय जाळण्याचे काम केले जात असल्याने संभाव्य दुर्घटनेची भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

खारघर सेक्टर-१४ मधील मटण विक्री दुकानाच्या अगदी शेजारी वीज पेटी, वीजवाहक तारा आणि इतर विद्युत उपकरणे असून, व्यावसायिकाने त्याच परिसरात स्वतःचे साहित्य ठेवण्याची तसेच बसण्याची व्यवस्था केली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे आग लागणे, शॉर्टसर्किट होणे किंवा अन्य विद्युत अपघात होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

खारघर सेक्टर-१४ मधील मार्केटमध्ये नागरिकांची मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून सुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, याची तपासणी करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सिडकोच्या खारघरमधील घरांना गळती; रहिवासी त्रस्त

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोने खारघर, सेक्टर-४० येथे उभारलेल्या भोगेश्री इमारतींमधील अनेक घरांमध्ये पावसाळा सुरू होताच छत आणि भिंतीमधून पाणी गळती होत असल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. घरांच्या छतांमधून, भिंतींच्या सांध्यातून तसेच खिडक्यांच्या बाजूने पाणी झिरपत असल्याने अनेक कुटुंबांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.



'सिडको'ने खारघरमध्ये उभारलेल्या सेक्टर-४० मधील भोगेश्री गृह प्रकल्पातील घरे रहिवाशांना ताब्यात देऊन ५ वर्षे झाली आहेत. मात्र, दरवर्षी पावसाळ्यात सोसायटीमधील अनेक घरांना गळतीची समस्या निर्माण होते. गेल्या ४ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे सोसायटीमधील जवळपास १० ते १५ घरांना गळती लागून पावसाचे पाणी शिरल्याने भिंतीवरील रंग उखडणे, प्लास्टर निघणे, फर्निचर, बेड तसेच इतर घरगुती वस्तूंचे नुकसान होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

घरामध्ये सतत होणाऱ्या गळतीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. भिंती ओलसर झाल्याने शॉर्टसर्किट होण्याची भीती व्यक्त केली जात असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. 'सिडको'ने या समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित इमारतींची पाहणी करावी, गळतीची कारणे शोधून कायमस्वरूपी दुरुस्ती करावी आणि रहिवाशांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी सेक्टर-४० मधील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पनवेलमधून रिक्षाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजीनगर येथील ५० नंबर बसस्टॉप परिसरातून एमएच ४६ एझेड ८३७१ क्रमांकाची रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणामुळे रिक्षाचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चोरीस गेलेली रिक्षा नुकतीच नव्याने तयार करण्यात आली होती. रिक्षेमध्ये साऊंड सिस्टीम व स्पीकरचीही व्यवस्था करण्यात आली होती.



रिक्षेचा उपलब्ध फोटो जुना असला तरी वाहनाचा क्रमांक एमएच ४६ एझेड ८३७१ हाच असल्याचे मालकांनी स्पष्ट केले आहे. रिक्षा चोरी झाल्यानंतर मालकांनी परिसरात शोधाशोध सुरू केली असून नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण पूर्व भागातील जनतेला पुनाडे धरणाचं शुद्ध पाणी मिळणार

उरण : रामप्रहर वृत्त

पुनाडे आठगाव पाणी कमिटीचे अध्यक्ष अविनाश ठाकूर जि प सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली मीटिंग संपन्न झाली. या मीटिंगमध्ये प्रामुख्याने सौरऊर्जाचे पॅनल बसवणे आणि पाणी शुद्ध कसे येईल यावर चर्चा करण्यात आली. लवकरात लवकर उरण पूर्व भागातील जनतेला पुनाडे धरणाचं शुद्ध पाणी देण्यात येईल असा आठगाव कमिटीच्या वतीने ठाम निर्णय घेण्यात आला. यावेळी पंचायत समितीच्या सदस्य प्रारंभी गावंड, माजी अध्यक्ष तथा सरपंच अनामिका म्हात्रे,उरण



तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी सरपंच व आठगाव कमिटीचे खजिनदार के. वाय. गावंड, पिरकोन सरपंच कलावती पाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, सचिव जगदीश पाटील, सदस्य अनिल पाटील, शांताराम म्हात्रे, अमित म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, रसिक पाटील, शनी कुमार ठाकूर, भीमराव ठाकूर आणि भूषण गावंड हे उपस्थित होते.

## संपादकीय

# पावसाचे धूमशान

मुंबई महानगर प्रदेशासह राज्यातील अनेक भागांत गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. सखल भाग जलमय झाले, वाहतूक सेवांवर परिणाम झाला आणि नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याबरोबरच यामध्ये नागरी सहभागाची गरज या पावसाने पुन्हा अधोरेखित केली आहे.

**यंदाचा मान्सून राज्यात दमदारपणे सक्रिय झाला असून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, पालघर, रायगड तसेच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले, काही ठिकाणी झाडे कोसळली, रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला, तर रेल्वे आणि बससेवाही काही प्रमाणात विस्कळीत झाली. पावसाचा वेग इतका होता की अनेक नागरिकांना कार्यालयात जाणे, विद्यार्थ्यांना शाळेत पोहचणे आणि दैनंदिन व्यवहार सुरळीत पार पाडणे कठीण झाले. मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) हा देशाच्या आर्थिक घडामोडींचे केंद्र मानला जातो. येथे दररोज लाखो नागरिक रेल्वे, मेट्रो, बस आणि खासगी वाहनांद्वारे प्रवास करतात. त्यामुळे मुसळधार पावसामुळे वाहतूक यंत्रणा विस्कळीत झाली की त्याचा परिणाम केवळ स्थानिक नागरिकांवरच नव्हे, तर उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्रावरही होतो. रेल्वे मार्गांवर पाणी साचणे, रस्त्यांवर वाहतूक कोंडी निर्माण होणे आणि काही ठिकाणी झाडे किंवा फांद्या कोसळल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होणे ही जवळपास दरवर्षी दिसणारी परिस्थिती आहे. यंदाही अनेक सखल भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना घराबाहेर पडताना अडचणी आल्या. काही ठिकाणी वाहनांचे नुकसान झाले, तर काही भागांत वीजपुरवठा तात्पुरता खंडित झाला. अग्निशमन दल, महानगरपालिका, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तातडीने मदतीसाठी सज्ज झाल्या. झाडे हटविणे, पाण्याचा निचरा करणे, वाहतूक सुरळीत करणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचविणे यासाठी विविध यंत्रणांनी समन्वयाने काम केले. मान्सून हा महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी जीवनदायी आहे. शेतकऱ्यांसाठी वेळेवर आणि समाधानकारक पाऊस अत्यंत आवश्यक असतो. धरणांतील पाणीसाठा वाढणे, भूजल पातळी उंचावणे आणि शेतीला आवश्यक ओलावा मिळणे यासाठी हा पाऊस महत्त्वाचा आहे, मात्र अल्प कालावधीत अतिवृष्टी झाल्यास त्याचे दुष्परिणामही तितकेच गंभीर असतात. शेतांमध्ये पाणी साचणे, पिकांचे नुकसान होणे, मातीची धूप होणे आणि ग्रामीण भागातील रस्ते खराब होणे अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे पाऊस आवश्यक असला तरी त्याचे स्वरूप संतुलित असणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांपासून हवामानातील बदल अधिक स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. कमी वेळेत अत्यंत मोठ्या प्रमाणावर पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत. हवामानातील ही अनिश्चितता शहरांसह ग्रामीण भागालाही नव्या आव्हानांसमोर उभी करत आहे. अशा वेळी हवामान विभागाने वेळोवेळी दिलेले इशारे आता अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. नागरिकांनीही अशा इशाऱ्यांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. अतिवृष्टीच्या काळात अनावश्यक प्रवास टाळणे, पूरग्रस्त भागात जाणे टाळणे, नदी-नाल्यांपासून सुरक्षित अंतर राखणे आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे हवामानाचा अंदाज अधिक अचूक होत असला तरी त्याचा प्रभावी उपयोग नागरिकांच्या सजगतेवरही अवलंबून आहे.**

# लेखक, चित्रकार, पटकथाकार व्यंकटेश माडगूळकर

श्रेष्ठ मराठी लेखक, चित्रकार, कथाकार आणि कादंबरीकार अशी व्यंकटेश दिगंबर माडगुळकर यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म ६ जुलै १९२७ रोजी सांगली जिल्ह्यातील माडगूळ येथे झाला. औपचारिक शिक्षण फारसे-मॅट्रिक-पर्यंतही-झाले नाही. तथापि, त्यांनी स्वप्रयत्नाने वाङ्मयाचा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचेही वाचन केले. विख्यात साहित्यिक ग.दि. माडगूळकर यांचे व्यंकटेश हे धाकटे बंधू. आपल्या वडील बंधूंच्या पाठोपाठ तेही साहित्यसृष्टीत आले आणि आपल्या प्रतिभेचा एक स्वतंत्र ठसा त्यांनी तेथे उमटविला.

आरंभी काही काळ पत्रकारी केल्यानंतर व्यंकटेश माडगूळकर १९५०च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी, माणदेशी माणसे (१९४९) हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी साहित्याला अनोखे होते. अद्भूतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी (१९५१), हस्ताचा पाऊस (१९५३), सीताराम एकनाथ (१९५१), काळी आई (१९५४), जांभळाचे दिवस (१९५७) यांसारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जगातिक भाषांत झालेले आहेत.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बनगरवाडी (१९५५), वावटळ (१९६४), पुढचं पाऊल (१९५०), कोवळ दिवस (१९७९), करुणाष्टक (१९८२) आणि सत्तांतर (१९८२) या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. बनगरवाडीतून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. रूढ अर्थाने या कादंबरीला कथानक नाही. बनगरवाडी नावाच्या या लहानशा गावातील सामूहिक जीवनाचे विविधांगी चित्रण तीत केलेले आहे. तेथील उजाड व निष्पर्ण सृष्टी, तेथील कंगालपणा, दुष्काळ, तेथील सण, उत्सव,



रूढी, परंपरा, श्रद्धा, संकेत तेथील रहिवाशांच्या जीवनांतील चढउतार यांना जिवंत शब्दरूप तेथे लाभले आहे. येथे कोणी विशिष्ट व्यक्ती नायक वा नायिका नाही, तर बनगरवाडी या गावालाच नायकत्व देण्यात आलेले आहे. इंग्रजी व डॅनिश या भाषांतून ही कादंबरी अनुवादिली गेली आहे. (इंग्रजी-द व्हिलेज हॅड नो वॉल्स-डॅनिश-Landsbyen). वावटळ, करुणाष्टक आणि कोवळे दिवस या त्यांच्या कादंबऱ्या आत्मचरित्रपर आहेत. गांधीवधानंतर झालेल्या भीषण दंगली, लुटालूट आणि जाळपोळ यांनी ब्राह्मण समाजावर झालेल्या आघाताची वावळट ही कहाणी होय. विंड्स ऑफ फायर या नावाने तिचे इंग्रजी भाषांतर झाले आहे. करुणाष्टकात दारिद्र्याने ग्रासलेली आठ मुलांची दुःखी आई त्यांनी उभी केली. व्यंकटेश माडगूळकर हे १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले होते. कोवळे दिवस या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव आहेत. पुढचं पाऊल ही त्यांच्याच एका कथेवरून त्यांनी लिहिलेली कादंबरी. एका दलित कलावंताच्या जीवनावरील या कादंबरीत त्याच्यावरील अन्याय, त्याबद्दलची त्याची चीड आणि पुढंच पाऊल टाकून प्रगतीचा मार्ग चोखाळण्याची दलित मनाची धडपड दाखविली आहे. 'सत्तांतर'मध्ये आरंभापासून अखेरपर्यंत वानरांच्या टोळ्यांचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण आहे. प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळ्यांची परस्परांच्या हद्दीत चालणारी घुसखोरी, त्यांचे संघर्ष नरानरांतले, माद्यामाद्यांतले सर्व वानरांची जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यांपासून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळविण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या ह्यांचे विलक्षण परिणामकारक दर्शन या छोट्याशा कादंबरीत आहे. सत्तांतर म्हणजे टोळीचा एक नायक जाऊन तेथे दुसरा नायक येणे. हे कसे घडते, हे या कादंबरीचे कथानक होय. तथापि, वानरांच्या या कथेतून मानवी जगातील वृत्तिप्रवृत्तींचीही प्रतीकात्मक पातळीवर प्रत्यय येत राहतो. 'काळाप्रमाणे संघर्षही सतत वाहतच असतो जेव्हा एखादी जात धोक्यात येते, बाहेरूक परकं कुणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो... संघर्ष पेटला, की शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात ते सुळे, नखं वापरतात. संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो' ही कादंबरीतली काही वाक्ये फार अर्थपूर्ण आहेत.

माडगूळकर यांनी नाटकेही लिहिली : तू वेडा कुंभार, सती, पति गेले गं काठेवाडी ही त्यांतील काही विशेष उल्लेखनीय होत. कुनाचा कुनाला मेळ न्हाई आणि बिनबियांचे झाड ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. त्यांनी लिहिलेल्या चित्रपटांत पुढचं पाऊल (कथा-१९५०), वंशाचा दिवा (कथा-१९५०), जशास तसे (कथा-१९५१), सांगत्ये ऐका (पटकथा, संवाद-१९५९), रंगपंचमी (पटकथा, संवाद-१९६१) यांचा समावेश होतो.

नागझिरा (१९७९), पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे (१९७९), पांढऱ्यावर काळे (१९७१), रानमेवा (१९७८), चित्रे आणि चरित्रे (१९८३) ही त्यांची पुस्तके ललित गद्य या प्रकारातली.

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ (१९५५-८५) नोकरीत होते.


माडगूळकरांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. त्यांत गावाकडील गोष्टी, काळी आई यांसारखे कथासंग्रह, बनगरवाडी ही कादंबरी आणि सती ही नाट्यकृती यांचा अंतर्भाव होतो. सत्तांतरला तर १९८३चे साहित्य अकादमीचे पारितोषिक प्राप्त झाले. १९८३मध्ये आंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला. २८ ऑगस्ट २००१ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**-श्रीराम पुजारी**

# आंतरराष्ट्रीय अर्थतज्ज्ञ विनायक दांडेकर

विनायक महादेव दांडेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म ६ जुलै १९२० रोजी सातारा येथे एका गरीब कुटुंबात, तर शिक्षण नागपूर, पुणे व कलकत्ता येथे झाले. १९४५मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी कुमुदिनी याही अर्थशास्त्रज्ञ. दांडेकर हे पुणे येथील गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक आणि लोणावळे येथील इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी या संस्थेचे संस्थापक-संचालक राहिले आहेत.

अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर विनायक दांडेकर यांनी तज्ञ सल्लागार म्हणून कामगिरी केली आहे. इंडियन सोसायटी ऑफ ग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स' (१९६७) व 'इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन (१९७३) या संस्थांच्या अधिवेशनांच्या अध्यक्षपदांचा मानही त्यांना



लाभला. आर्थिक विषयावरील संशोधनाबरोबरच अर्थशास्त्र व संख्याशास्त्राचे अध्यापनही ते विद्यापीठ पातळीवरून करीत. मराठी भाषेतून ते प्रभावी वक्तृत्वही करायचे.

प्रा. दांडेकर यांनी आर्थिक विषयांवर १५ संशोधनपर ग्रंथ व सु. ९० निबंध प्रकाशित केले आहेत. त्यांचा मूळ अभ्यासविषय संख्याशास्त्र हा असल्यामुळे त्यांच्या अर्थशास्त्रीय लेखनाला नेमकेपणा व ठामपणा आला. दांडेकरांचे बहुतांशी लेखन इंग्रजीतून झालेले असले तरी त्यांनी मराठीतूनही महत्त्वाचे लेखन केले आहे. भारतातील दारिद्र्य व गावरहाटी हे त्यांचे प्रमुख अर्थग्रंथ. याशिवाय अर्थ शास्त्रीय विषयांवर त्यांनी अनेक लेख मराठीतून लिहिले आहेत. शेती, सहकार, अन्नधान्ये, लोकसंख्या, छोटे उद्योगधंदे, भारताची आर्थिक परिस्थिती, शेतीविषयक कायदे इ. त्यांच्या संशोधनपर लेखनाचे विषय होत. सामान्य वाचकाला समजेल असे लेखन सामाजिक शास्त्रज्ञांनी मराठीतून अत्यल्प प्रमाणात केलेले आहे. दांडेकरांचे लेखनही अल्प असले तरी ते सुबोध आहे. 'गोमाता की गोधन?', 'भारतीय बुद्धिमंतांची निर्यात', 'ललाटरी' (सरकारी सोडती) इत्यादी त्यांचे लेख गाजलेले आहेत.

दांडेकरांचा पॉव्हर्टी इन इंडिया (सहलेखक : डॉ. नीलकंठ रथ) हा आर्थिक विषयावरील इंग्रजीमधील एक महत्त्वाचा व गाजलेला ग्रंथ. त्याचा मराठी अनुवाद भारतातील दारिद्र्य (१९७३) ह्या शीर्षकाने पुण्याच्या समाज प्रबोधन संस्थेने प्रसिद्ध केला आहे. दांडेकरांचे ३१ ऑगस्ट १९९५ रोजी निधन झाले.

**-बाळ गाडगीळ**



## बदलते तंत्रज्ञान

### ...म्हणून 'ॲपल'कडून लेदर आयफोन केसेस अचानक बंद

जगभरात प्रीमियम आणि स्टेटस सिंबल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयफोनची क्रेझ भारततही प्रचंड आहे. आयफोनच्या सुरक्षेसाठी आणि त्याला एक लक्झरी लुक देण्यासाठी अनेक जण कंपनीचे अधिकृत 'लेदर आयफोन केसेस' वापरण्यास पसंती देत असत, मात्र ॲपलने अचानक आपले हे लोकप्रिय लेदर केसेस बनवणे पूर्णपणे बंद केले आहे. अनेकांसाठी हा निर्णय धक्कादायक होता, पण यामागे कंपनीचा एक महत्त्वाचा आणि जागतिक हेतू दडला आहे.



ॲपलने २०१३मध्ये 'iPhone ५S'च्या लॉंचिंगसोबत आपले अधिकृत लेदर केसेस बाजारात आणले होते. कंपनीने या केसेसची विक्री एक प्रीमियम ॲक्सेसरी म्हणून केली होती. या लेदर कव्हर्सची फिनिशिंग, हातातील ग्रीप आणि मिळणारा लक्झरी लुक यामुळे आयफोन युजर्समध्ये याची प्रचंड क्रेझ होती. कंपनीने अनेक वर्षांपर्यंत या केसेसची बंपर विक्री केली.

सध्या जगभरात पर्यावरण संवर्धनाबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली आहे. ग्राहक आता अशा उत्पादनांकडे वळत आहेत, ज्यांचा पर्यावरणावर कोणताही वाईट परिणाम होणार नाही. ॲपल कंपनीनेही २०३०पर्यंत पूर्णपणे 'कार्बन न्यूट्रल' होण्याचे मोठे ध्येय ठेवले आहे.


लेदर तयार करण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर कार्बनचे उत्सर्जन होते, जे पर्यावरणासाठी अत्यंत घातक मानले जाते. आपल्या याच जागतिक ध्येयाला पूर्ण करण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ॲपलने लेदर केसेसचे उत्पादन कायमचे बंद करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

लेदर केसेस बंद केल्यानंतर आयफोन युजर्सना कोणता पर्याय द्यायचा, असा प्रश्न कंपनीसमोर होता. यावर उपाय म्हणून ॲपलने 'FineWoven' नावाचे एक नवीन मटेरियल बाजारात आणले. हे मायक्रोट्विल फॅब्रिकपासून बनवले होते. याचा कार्बन फूटप्रिंट लेदरपेक्षा खूपच कमी होता आणि ते मऊ असल्याचा दावा कंपनीने केला होता, परंतु, लॉंच झाल्यानंतर काही दिवसांतच या 'FineWoven' केसेसबद्दल ग्राहकांच्या तक्रारी येऊ लागल्या. या कव्हर्सवर खूप लवकर स्क्रॅच पडतात, डाग पडतात आणि ते जास्त काळ टिकत नाहीत, अशा तक्रारी युजर्सनी केल्या. अखेर कंपनीला हे मटेरियलही बंद करावे लागले. ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेत ॲपलने २०२५ मध्ये 'TechWoven' हे नवीन मटेरियल सादर केले आहे.

# भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामा प्रसाद मुखर्जी

एक थोर राष्ट्रीय नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ञ अशी श्यामा प्रसाद मुखर्जी यांची ओळख राहिली आहे. आज त्यांची जयंती. त्यांचा जन्म ६ जुलै १९०१ जून रोजी कलकत्त्यात (आताचे कोलकाता) प्रसिद्ध मुखर्जी घराण्यात झाला. त्यांचे वडील आशुतोष मुखर्जी विख्यात न्यायाधीश आणि पुढे कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू, तर त्यांच्या आईचे नाव जोगमायादेवी. हुशार विद्यार्थी म्हणून श्यामा प्रसाद यांनी कीर्ती मिळविली आणि प्रत्येक परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला क्रमांक मिळविण्याचा त्यांनी विक्रमच केला.

श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठातून बीए झाले (१९२१). विद्यार्थीदशेतच त्यांचा विवाह सुधादेवी या मुलीशी झाला (१९२२). त्यांना दोन मुले व दोन मुली झाल्या. लग्नानंतर त्यांच्या वडिलांचे निधन पुढच्याच वर्षी झाले. तेव्हा त्यांची कलकत्ता विद्यापीठाच्या सीनेटवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी बीएल (१९२४) ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले (१९२७). लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरु केली. ते बंगाल कायदेमंडळावर निवडून आले (१९२९), पण वर्षभराने गांधीजींच्या देशव्यापी कायदेभंग आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. या वेळी कॉंग्रेसच्या एकूण धोरणाविषयी ते नाराज



### निमित्त

होते. परिणामतः ते हिंदू महासभेकडे वळले.


पुढे श्यामा प्रसाद कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले (१९३४). त्याच वर्षी त्यांच्या पत्नी सुधादेवी निवर्तल्या. त्यानंतर अखेरपर्यंत त्यांनी दुसरा विवाह केला नाही. हिंदू महासभेतर्फे ते १९३७मध्ये बंगालच्या कायदेमंडळावर पुन्हा निवडून आले. मुस्लिम लीगच्या १९४०च्या लाहोर ठरावानंतर त्यांनी फाळणीविरूद्ध देशभर प्रचार केला. त्या आधी काही काळ ते हिंदू महासभेचे हंगामी अध्यक्षही होते. लीग मंत्रिमंडळाच्या पराभवानंतर ते बंगालच्या फझलुल हक मंत्रिमंडळात सामील झाले, पण भारत छोडो आंदोलनाच्या वेळी त्यांनी गांधीजी व इतर कॉंग्रेस नेत्यांची सुटका आणि संभाव्य जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या स्थापनेची मागणी केली. या प्रश्नांवर तड लावण्यासाठी नंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

१९४३च्या बंगालच्या भीषण दुष्काळात श्यामा प्रसादांनी दुष्काळ निवारण्यासाठी खूप कष्ट घेतले. १९४७च्या सुरुवातीस देशाची फाळणी होणार असे दिसू लागल्यावर त्यांनी बंगालच्याही फाळणीचा आग्रह धरला. भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरु यांच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते उद्योग आणि पुरवठामंत्री झाले. त्या आधीच हिंदू महासभेमध्ये अहिंदूंनाही प्रवेश द्यावा या मुद्यावर त्यांनी त्या पक्षाचा राजीनामा दिला होता. मंत्री म्हणून त्यांनी फार अल्प काळ काम केले. नेहरू-लिकायत अलीखान कराराच्या निषेधार्थ त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला (१९५०). तथापि, त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन चलनशील यंत्र कारखाना व सिंद्री खत कारखाना हे दोन भव्य प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी सुरू होऊन भारताच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली.

कॉंग्रेसला शह देण्यासाठी श्यामा प्रसाद यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली (१९५१). पक्षात पहिल्यापासूनच सर्वांना प्रवेश खुला ठेवण्यात आला होता. १९५२च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत ते जनसंघातर्फे लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी विरोधी पक्षांची एक राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. त्याचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. जम्मू-काश्मीरमध्ये तुरुंगवासातच त्यांचा २३ जून १९५३ रोजी मृत्यू झाला. **(साभार : विकासपीडिया)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### सकाळी उपाशीपोटी चहा पिण्याचे दुष्परिणाम

अनेकांच्या दिवसाची सुरुवात गरमागरम चहाने होते. चहा प्यायल्याने ताजेतवाने वाटते आणि ऊर्जा मिळाल्यासारखे वाटते, मात्र रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय दीर्घकाळ आरोग्यासाठी घातक ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, सकाळी काहीही न खाता चहा प्यायल्यास पचनसंस्था आणि एकूण आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.



**ॲसिडिटी आणि छातीत जळजळ**

चहामध्ये कॅफिन आणि टॅनिन हे घटक असतात. हे पोटात ॲसिड तयार होण्याचे प्रमाण वाढवू शकतात. उपाशीपोटी चहा घेतल्यास पोटाच्या आतील आवरणावर परिणाम होऊन ॲसिडिटी, जळजळ व आंबट ढेकरांचा त्रास होऊ शकतो.

**गॅस आणि अपचन**

उपाशीपोटी चहा पिण्यामुळे काही लोकांना गॅस, पोट फुगणे आणि अपचनाचा त्रास होऊ शकतो. खासकरून ज्यांची पचनसंस्था संवेदनशील असते, त्यांना हा त्रास अधिक जाणवू शकतो.

**मळमळ आणि अस्वस्थता**

चहातील टॅनिनमुळे काहींना मळमळ, घाबरल्यासारखे वाटणे किंवा पोटात अस्वस्थता जाणवू शकते. खासकरून कडक चहा उपाशीपोटी घेतल्यास ही समस्या वाढू शकते.

**पोषक घटकांचे शोषण कमी होणे**

काही संशोधनांनुसार, चहातील काही घटक शरीरात लोह यांसारख्या महत्त्वाच्या पोषक तत्त्वांचे शोषण कमी करू शकतात. त्यामुळे दीर्घकाळ ही सवय कायम राहिल्यास पोषणासंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात.

**ताण आणि हृदयाचे ठोके वाढणे**

चहातील कॅफिनमुळे तात्पुरती ऊर्जा मिळते. मात्र, उपाशीपोटी जास्त प्रमाणात कॅफिन घेतल्यास घाबरल्यासारखे वाटणे, चिडचिड, तणाव आणि हृदयाचे ठोके वेगाने धडधडण्याचा त्रास होऊ शकतो.

**शरीरात पाण्याची कमतरता**

कॅफिनमध्ये मूत्रवर्धक गुणधर्म असतात. सकाळी उठल्यानंतर शरीरात आधीच पाण्याची कमतरता असू शकते. अशावेळी फक्त चहा पिण्याऐवजी आधी एक-दोन ग्लास पाणी पिणे अधिक फायदेशीर ठरते.

तज्ज्ञांचा सल्ला - सकाळी उठल्यानंतर प्रथम पाणी प्या. त्यानंतर फळ, सुका मेवा किंवा हलका नाश्ता करून मग चहा घ्या. यामुळे चहाचे संभाव्य दुष्परिणाम कमी होऊ शकतात.

# कर्जतमध्ये पावसात डोंगर खचले, पूल बुडाले!

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात गेल्या अनेक तासांपासून सुरू असलेल्या सततधार पावसामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. अनेक सखल भागात पाणी साचले असून रस्ते, पूल आणि डोंगराळ भाग धोकादायक बनले आहेत. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले असून विविध ठिकाणी परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.





उमरोली परिसरातील डोंगराचा काही भाग खचल्याची घटना समोर आली आहे. तसेच डोंगरावरील मोठे दगड खाली कोसळण्याची शक्यता असल्याने या परिसरात राहणारे रहिवाशी दहशतीखाली असून सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला.

दरम्यान, कर्जतकल्याण राज्य मार्गावरील भिवपुरी रोड येथे रायगड हॉस्पिटलसमोरील रस्ता पाण्याखाली गेला आहे. रस्त्यालगत विकासकाने केलेल्या खोदकामामुळे पावसाचे पाणी थेट रस्त्यावर आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. परिणामी हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक, कर्मचारी तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी सुरक्षित मार्ग उरलेला नाही. राज्य मार्गावर पाणी साचल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला असून अपघाताचा धोका वाढला आहे. नेरळ ग्रामपंचायत हद्दीत गणेश घाट परिसरात पाणी साचले आहे.

नेरळजवळील दहिवली पुलावर उल्हास नदीचे पाणी आल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे सुमारे ५० गावांचा संपर्क तात्पुरता तुटला असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर वावे बेंडसे पूल देखील उल्हासनदीच्या पाण्याखाली आला असून वाहतूक बंद झाली.गावचा संपर्क तुटला.

दुसरीकडे, कर्जत तालुक्यातील दुर्गम खांडस गावाकडे जाणाऱ्या मार्गावर कशेळे नाक्याजवळ मोठे झाड कोसळल्याने संपूर्ण रस्ता बंद झाला आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने झाड हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून रस्ता पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.त्याच प्रमाणे धाबेवाडी च्या उताराला झाड पडले आहे.

सततच्या पावसामुळे तालुक्यातील नदी-नाले दुथडी भरून वाहत असून डोंगराळ भागात दरडी कोसळण्याचा धोका वाढला आहे. प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावूरग्रस्त व डोंगराळ भागात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पेणच्या हमरापूर विभागातील पूरपरिस्थितीची सभापती वैकुंठ पाटील यांनी केली पाहणी





**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील हमरापूर विभागातील तांबडशेत गावात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची आज रायगड जिल्हा परिषदेचे सभापती तथा भाजपा दक्षिण रायगडचे महामंत्री वैकुंठ पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पूरग्रस्त नागरिकांच्या घरांना भेट देत त्यांनी त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि प्रशासनाला तातडीने आवश्यक मदत करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पूरामुळे बाधित झालेल्या गणेशमूर्ती कार्यशाळांचीही त्यांनी पाहणी करून कारागिरांशी संवाद साधला. यावेळी पूरग्रस्त नागरिकांनी वैकुंठ पाटील यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त करत, 'आम्हाला नुकसानभरपाई मिळाली नाही तरी चालेल, पण हमरापूर विभागाचा संपर्क कायमस्वरूपी सुरळीत राहावा यासाठी रस्त्यावर मोरी उभारून द्या,' अशी मागणी केली. नागरिकांच्या या मागणीची गंभीर दखल घेत संबंधित विभागाशी पाठपुरावा करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन वैकुंठ पाटील यांनी दिले. शासनामार्फत पूरग्रस्तांना सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## नागोठणे लायन्स क्लबच्या नेत्रचिकित्सा शिबिरास प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे लायन्स क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास चौलकर यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या कार्यकाळातील पहिल्याच मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात एकूण ५६ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली होती. यापैकी मोतीबिंदू आढळलेल्या १९ रुग्णांवर शंकरा आय हॉस्पीटल येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.नागोठणे लायन्स क्लबचे सदस्य लायन नजमुद्दीन व्होरा यांच्या मे. पॉप्युलर ट्रेडर्स नागोठणे यांच्या सौजन्याने येथील शांतीनगर मध्ये नागोठणे लायन्स क्लबकडून दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी होणाऱ्या मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उपक्रमांतर्गत जुलै महिन्याच्या पहिल्या बुधवारी (दि.१) हे मोतिबिंदू शिबिर घेण्यात आले.



## मुसळधार पावसामुळे मुंबई-पुणे महामार्गाला सागरी मार्गाचे स्वरूप

**चौक : प्रतिनिधी**

सतत पडणाऱ्या पावसामुळे आणि आय आर बी या देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीच्या ढिसाळ आणि नियोजन शून्य कामामुळे जुन्या मुंबई पुणे रस्त्याला सागरी मार्गाचे स्वरूप आल्याने आज पहाटे पासून या मार्गावरील वाहतूक कोंडी सुरू झाली.

सतत पडणाऱ्या पावसाने थैमान घातले आहे, अनेक ठिकाणी पाणीच पाणी साचले आहे. जुन्या मुंबई पुणे रस्त्याकडे विशेषता पुणे मार्गावर डोंगरातील पाणी येत असते, त्यातच मुंबई पुणे रस्त्याच्या दुतर्फा नवीन बांधकाम सुरू झाले असून अनेक ठिकाणी नैसर्गिक नाले बुजवले असून काहींचा मार्ग बदला असल्याचे दिसत आहे. त्यामुळे दांडफाटा ते कलोते पर्यंत दरम्यान रस्त्यावर काही ठिकाणी जलमय झाले होते. मध्यरात्री पावसाचा जोर वाढला असून पहाटे वावंढळ हद्दीत,





कलोते व लोधीवली हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वर पाणीच पाणी साचले असल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती, पहाटे पासून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर व चौक पोलीस यांनी या ठिकाणी येऊन वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला पण वावंढळ येथे पुणे रस्त्यावर पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने वावंढळ बस स्थानक येथून एकरी मार्ग करावा लागला, पहाटे अंधार असल्याने जोरदार येणाऱ्या गाड्यांची भीती निर्माण झाली होती, याचा दरम्यान पोलिसांनी आय आर बी यांना संपर्क साधला होता, पण सकाळी दहा वाजेपर्यंत त्यांचा पत्ता नव्हता.अगदी सकाळी पुणे कडे जाणाऱ्या वाहतुकीचा जोर वाढला, यात लोणावळा खंडाळा येथे जाणारे आणि जवळपास पावसाळी पर्यटन करणारे यांचे प्रमाण जास्त होते, दुचाकी यांची मोजदाद नव्हती, त्यांच्या गतीला मर्यादा देखील नव्हती.सालाबादप्रमाणे वावंढळ हद्दीत पद्मावती पेट्रोल पंप येथे पुणे लाइन वर मोठ्या प्रमाणात पाणी साचून तलावाची निर्मिती झाली होती.त्यामुळे वाहतूक वावंढळ बस स्थानक येथून एकमार्गी सुरू करण्यात आली होती. पोलिसांचे मनुष्य बळ कमी होते,यावेळी पोलिसांनी सामाजिक कार्यकर्ते व गाव पोलीस पाटील यांना पाचारण करून मदतीस बोलावले स्थानिक पत्रकार अर्जुन कदम यांनी गावातील काही जणांना घेऊन तर भिलवले पोलीस पाटील

अनंत ठोंबरे यांनी वावंढळवाडी, चौक फाटा, विनेगाव व कलोते येथील पोलिसांच्या व पोलीस पाटलांच्या मदतीने वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. वावंढळ हद्दीत पद्मावती पेट्रोल पंप येथे गेले चार ते पाच वर्षे पाणी साचत आहे, ही बाब या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या आय आर बी या कंपनीला चांगले माहिती आहे, जुन्या रस्त्याच्या म्हणजे मुंबई रस्त्याच्या मोऱ्या मोठ्या व रुंद आहेत, मात्र नवीन मार्ग पुणे रस्त्याच्या मोऱ्या लहान असल्याने पाणी वाहून जाणास अडथळा येत आहे, ही बाब आय आर बी ही कंपनी का लक्षात घेत नाही,हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# खरोशीत पुराचा कहर; दरड व झाड कोसळून नुकसान, ७० ते ८० घरांत शिरले पाणी!





**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खरोशी गावात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. खरोशी-दुरशेत परिसरातून वाहणाऱ्या बाळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने गावात महापुराची परिस्थिती निर्माण झाली आहे. नदीच्या पाण्याने गावातील सुमारे ७० ते ८० घरांमध्ये पाणी शिरल्याने घरांसह जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सलग दुसऱ्या वर्षी गावाला महापुराचा फटका बसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, गावातील एका घरावर दरड कोसळल्याने घराच्या भिंतीला तडा गेला असून मोठे नुकसान झाले आहे. तसेच दुसऱ्या एका घरावर मोठे झाड कोसळल्याने त्या घराचेही नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती मिळालेली नाही. ग्रामपंचायतीच्या सरपंच रूपाली महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील ज्येष्ठ मंडळी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत असून ज्या घरांमध्ये पाणी शिरले आहे, त्या घरांतील आबालवृद्धांना तातडीने सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे, अशी माहिती सरपंच रूपाली पाटील यांनी दिली. पूरग्रस्त भागातील परिस्थितीवर प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक ती मदत व उपाययोजना सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

## प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष शैलेश रावकर यांचा गाडी मालकांकडून जाहीर सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

प्रियदर्शनी चालक मालक वाहक सहकारी वाहतूक संस्थेचे अध्यक्षपद मार्च २०२६ मध्ये स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांत संस्थेच्या प्रगतीला नवी गती देण्यात यशस्वी ठरलेल्या अध्यक्ष शैलेश रावकर यांचा संस्थेचे सल्लागार, संचालक मंडळ, सभासद व गाडी मालकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.



शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात सल्लागार समिती, संचालक मंडळ, गाडी मालक व चालक यांची संस्थेच्या विविध कामकाजांवर साधक-बाधक चर्चा करण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी गाडी मालकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले तसेच संस्थेमार्फत सुरू असलेल्या व आगामी उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली.

अध्यक्ष शैलेश रावकर यांनी लोकनेते रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांची भेट घेऊन नागोठणे येथील रिलायन्स कंपनीमधून गाडी मालकांना अधिक मालवाहतुकीचे काम उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गाडी मालकांसाठी तातडीने ताडपत्रीची व्यवस्था करण्यात आली.

## रक्तदान श्रेष्ठदान आणि काळाची गरज -नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा राजिपचे माजी सभापती अँड.राजीव साबळे यांचा मंगळवार दि.७ जुलै रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री गंगुबाई शिंदे सिबीएससी इंग्रजी शाळा याठिकाणी दि.७ जुलै रोजी मशिप्र मंडळ,अँड.साबळे मित्रमंडळ यांच्यातर्फे व शासकीय रक्तपेढी केईएम रुग्णालय परेल तसेच जनकल्याण रक्तपेढी महाड यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान असून काळाची गरज ओळखून या सामाजिक उपक्रमात रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आव्हान माणगाव नगरीच्या नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांनी केले आहे.

आज खऱ्या अर्थाने रक्तदान शिबिरासारख्या सामाजिक उपक्रमांची गरज आहे. मुंबई -गोवा महामार्ग,दिघी - पुणे राज्य मार्ग तसेच गावाकडील रस्त्यांवर लहान-मोठे अपघात घडत असतात. या अपघातातील जखमी अपघातग्रस्थांना रक्ताची गरज भासल्यास रक्तदान शिबिरातून संकलित करण्यात आलेल्या रक्तातून अशा अपघातग्रस्थांचे प्राण वाचू शकते.




## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: **coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in**, वेबसाइट: **kbmc.gov.in.**

जा.क्र.: कुबनप/नगरोस्थान/साबां/२९६/२०२६-२७ | दिनांक : ०६/०७/२०२६

**जाहिर ई- निविदा सुचना क्र.१५/२०२६-२७**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०७ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.०६/०७/२०२६ ते दि.१३/०७/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वाजेपर्यंत असून दि.०८/०७/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई-निविदा दि. १४/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.


निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
( मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद


## कर्जतमध्ये संततधार पाऊस; साकव, पुलांसह घरांमध्येही पाणी

**कर्जत : प्रतिनिधी**

गेले तीन दिवस कर्जत तालुक्यात संततधार पाऊस सुरु असून उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने छोटे पुल, साकव तसेच महामार्गावरील पुलावरून पाणी गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. कर्जत शहरातील श्रीराम पुला जवळील विशाल अपार्टमेंटमध्ये पाणी शिरले. असाच पाऊस सूरु राहिला तर कर्जत नगरपरिषद हद्दीतील इंदिरानगर, नानामास्तर नगर, कोतवाल नगरमध्ये पाणी शिरण्याची शक्यता आहे.



पावसाने उशिरा सुरुवात केली परंतु तीन दिवसांच्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. नेरळ - कळंब रस्त्यावर असलेल्या दहिवली नजिकच्या उल्हास नदीवरील पुलावरून पाणी वाहून जात असल्याने रहदारी बंद करण्यात आली. वावे येथील पुल सुद्धा पाण्याखाली गेला. सापेले भागातील रस्त्यावरून पाणी वाहू लागल्याने नागरिकांना जाण्या - येण्यासाठी कसरत करावी लागत होती. कर्जत शहरातील जुन्या भगवान टॉकीज भागातील एका घरात पाणी शिरले होते. तेथील गटारातील पाण्याला मार्ग नव्हता म्हणून ही समस्या ओढवली गेली.

कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रे येथील रेल्वे पुला खालील भैरवनाथ नगर परिसरात मुसळधार पावसामुळे चार ते पाच घरांमध्ये पाणी शिरल.या भागात प्रथमच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. नवीन पनवेल रेल्वे स्थानकाच्या कामादरम्यान नैसर्गिक पाण्याच्या निचऱ्याचा मार्ग बंद झाल्याने पाणी साचून ते घरांमध्ये शिरत असल्याचे प्राथमिक पाहणीत स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नगराध्यक्षा पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, अतुल कडू, सोमनाथ पालकर आदिंनी घटनास्थळी पाहणी केली. रेल्वे प्रशासनाला अधिकृत पत्र देऊन नैसर्गिक नाला खुला करून पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी नगरपरिषद करणार असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-13/26-27 7000040353 ... 2nd call | Replacement of existing battery set by new conventional SAN type battery sets at various substation under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee: Rs. 5,900/- including GST.** | Rs. 178.84 Lakhs including GST. |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 03.07.2026 at 11:00 Hrs. to 13.07.2026 up to 15:00 hrs, Opening date: 13.07.2026 @ 15:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# ऐरोली नाट्यगृह बनले दारुड्यांचा अड्डा

## भाजपच्या सांस्कृतिक सेलने उघडकीस आणला प्रकार

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपाच्या सांस्कृतिक सेलचे सुनील पगार यांनी ऐरोली नाट्यगृहाच्या कामकाजाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात चक्क दारूच्या बाटल्यांचा खच पडलेला आढळून आला. नाट्यगृह सुरक्षा व कामगार सुरक्षेबाबत शनिवारी ४ जुलै २०२६ रोजी पहाणी दौऱ्याचं आयोजन पालिकेच्याच संबंधित विभागाकडून करण्यात आले होते. यावेळी, न.मुं.म.पा स्थापत्य विभाग उपअभियंता जितेंद्र नाईक, कनिष्ठ अभियंता धनेश चव्हाण, विद्युत विभाग अधिकारी, सेफ्टी ऑफिसर यासोबत इतर पालिका व कंत्राटदाराच्या संबंधित व्यक्ती या दौऱ्यात सहभागी झाले होते.या घटनेने नाट्यगृह दारुड्यांचा अड्डा बनल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या नाट्यगृहाला लागलेले ग्रहण कधी सुटणार असे प्रश्न विचारले जात आहेत.



ऐरोली येथील नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत तसेच, नाट्यगृहाचे काम करत असलेल्या कामगारांच्या सुरक्षा याबाबत काही दिवसांपूर्वीच अभिनेता व भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ठ नवी मुंबई जिल्हा प्रभारी सुनील पगार यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. यावेळी कामगार कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय या नाट्यगृहात काम करत असल्याचे आढळले होते. पालिकेचे अभियंता देखील इथे उपस्थित नसल्याचे दिसून आले होते. त्यामुळे या नाट्यगृहाचे कामकाज कोणाच्या भरोसे सुरू आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत नवी मुंबई महानगरपालिका महापौर व आयुक्त यांना निवेदन देत संबंधित विभागाला देखील याबाबत भाजपाच्या सांस्कृतिक सेलकडून कळवण्यात आले होते. त्यानंतर, नाट्यगृह परिसरात सुरक्षेबाबत सर्व काळजी घेतली जात असल्याचे संबंधित पालिका विभागाकडून खात्रीशीररित्या सांगण्यात आले. याबाबत भाजपाच्या संस्कृतिक सेलच्या पदाधिकाऱ्यांना कामकाजाची पाहणी करण्यासाठी ४ जुलै रोजी पाचारण करण्यात आले. त्यानुसार संस्कृतिक सेलचे सुनील पगार व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी, नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत पाहणी दौरा करत असतांना आणखीन एक धक्कादायक प्रकार अभिनेता सुनील पगार यांनी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला. नाट्यगृहाच्या आत दारूच्या बाटल्या वेगवेगळ्या ठिकाणी पडलेल्या आढळून आल्या. नवी मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या समोरच हा प्रकार निदर्शनास आल्यावर सेफ्टी ऑफिसर यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. परंतु अधिकाऱ्यांच्या समोरच नाट्यगृहात विविध ठिकाणी दारूच्या बाटल्या दिसून आल्यावर मात्र पुन्हा एकदा नाट्यगृहांत चाललेल्या प्रकाराबद्दल सुनील पगार यांनी चिंता व्यक्त केली.

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी नाट्यगृहाला आग लागली तेव्हापासून एकदाही जबाबदार अधिकारी म्हणून भेट दिली नाही अशी खंत यावेळी, सुनील पगार यांनी व्यक्त करत आयुक्तांनी नाट्यगृह परिसराला भेट द्यावी. आणि संबंधितांना सुरक्षेबाबत निर्देश देऊन नाट्यगृहाचं काम यशस्वी पणे पूर्ण करावे अशी मागणी सुनील पगार यांनी केली.

**नाट्यगृहाच्या आत दारूच्या बाटल्या आढळून आल्या ही बाब चिंताजनक आहे. नाट्यगृहाच्या सुरक्षेकडे पालिकेने व कंत्राटदाराने काटेकोर लक्ष देऊन काम पूर्णत्वास न्यावे.**
**–अनंत सुतार,**
भाजप महामंत्री,

**न.मुं.म.पा च्या संबंधित विभागाने मला शनिवारी नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत काळजी घेत आहोत हे दाखवण्यासाठी पहाणी दौरा आयोजित केला होता. यावेळी, नाट्यगृहाच्या आत विविध ठिकाणी दारूच्या बाटल्या दिसल्या हा प्रकार चुकीचा आहे. त्यामुळे आयुक्तांनी संबधीत विभागाला कंत्राटदाराला सूचना कराव्या.**
**–अभिनेता सुनील पगार,**
भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ
नवी मुंबई जिल्हा प्रभारी

# मोरबे धरणातील जलसाठ्यात वाढ

## गेल्या २४ तासांत धरण परिसरात २७० मिमी पावसाची नोंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबईत गेल्या २४ तासांत मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावत सरासरी २१०.७६ मिमी पावसाची नोंद झाली. या पावसामुळे मोरबे धरणातील जलसाठ्यातही लक्षणीय वाढ झाली आहे.

४ जुलै रोजी सकाळी ८.३० ते ५ जुलै रोजी सकाळी ८.३० या कालावधीत बेलापूरमध्ये सर्वाधिक ३०२.७८ मिमी पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल ऐरोलीमध्ये २४७.६० मिमी, दिघ्यात २२१.२० मिमी, कोपरखैरणेमध्ये १९९.२० मिमी, नेरुळमध्ये १५२ मिमी आणि वाशीत १४१.८० मिमी पावसाची नोंद झाली. १ जूनपासून आतापर्यंत शहरात १,०२०.२२ मिमी पाऊस झाला आहे.

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या नोंदीनुसार या कालावधीत शहरात २५ ठिकाणी झाडे कोसळली, सात ठिकाणी पाणी साचले, एका ठिकाणी झाडाची फांदी पडली, एका ठिकाणी आग लागली आणि एका ठिकाणी स्लॅब कोसळण्याची घटना घडली. सर्व घटनांवर महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन विभागाने तातडीने प्रतिसाद देत आवश्यक उपाययोजना केल्याचे महापालिकेने प्रशासनाने सांगितले

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम मोरबे धरणाच्या पाणीसाठ्यावर दिसून येत आहे. धरण परिसरात गेल्या २४ तासांत २७०.२० मिमी पावसाची नोंद झाली असून १ जूनपासून आतापर्यंत ८७१.४० मिमी पाऊस झाला आहे. त्यामुळे धरणाची जलपातळी ७२.१५ मीटरपर्यंत पोहोचली असून धरणात ३३.९६ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे. जुलैच्या सुरुवातीलाच जलसाठ्यात झालेली ही वाढ नवी मुंबईच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने दिलासादायक मानली जात आहे. मात्र, समाधानकारक साठ्यासाठी आगामी काळातही सातत्याने पावसाची आवश्यकता असल्याचे महापालिका प्रशासनाचे म्हणणे आहे.

## शहाबाजमधील १७ सदनिकांतील रहिवाशांचे स्थलांतर

**नवी मुंबई** : बेलापूर सेक्टर १९ येथील शहाबाज गावातील एका इमारतीच्या बाल्कनीचा स्लॅब कोसळल्याने १७ सदनिकांतील रहिवाशांचे तातडीने स्थलांतर करावे लागले, मात्र २०० मिमीहून अधिक पाऊस होऊनही शहरातील जनजीवन बहुतांश सुरळीत राहिले. मॅफ्को चौक, ऐरोली टी–जंक्शन आणि एपीएमसी परिसरातील काही मोजक्या ठिकाणीच पाणी साचल्याची नोंद झाली.

शहाबाज गावातील अविघ्न को–ऑपरेटिव्ह सोसायटीच्या पाच मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील बाल्कनीचा स्लॅब शनिवारी रात्री अचानक कोसळला. माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन विभागाने घटनास्थळी धाव घेत इमारतीतील १७ सदनिकांमधील सर्व रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

# घणसोलीत जोरदार वाऱ्यामुळे पत्रे कोसळले; वाहनांचे नुकसान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय हवामान विभागाने मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशासाठी रविवारीही रेड अलर्ट जारी करून जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा दिलेला असतानाच घणसोलीतील मेघ मल्हार सोसायटीलगत सुरू असलेल्या बांधकाम साइटवरील लोखंडी पत्रे अचानक कोसळून रस्त्यालगत उभ्या असलेल्या सुमारे आठ ते दहा चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले.सुदैवाने घटना घडली त्यावेळी वाहनांमध्ये किंवा परिसरात कोणीही नसल्याने कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नाही.

रविवारी सकाळपासून नवी मुंबईत पावसासह जोरदार वारे वाहत होते. या वाऱ्यामुळे बांधकाम प्रकल्पाभोवती उभारण्यात आलेली लोखंडी पत्रे अचानक कोसळले. हे पत्रे थेट रस्त्यालगत पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर पडल्याने अनेक वाहनांचे छप्पर, काचा, बोनेट आणि इतर



भागांचे मोठे नुकसान झाले.

घटना घडली त्यावेळी वाहनांमध्ये कोणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र काही क्षणांचा फरक पडला असता गंभीर अपघात घडू शकला असता, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. नुकसानग्रस्त वाहनधारकांनी बांधकामस्थळी सुरक्षेचे निकष पाळले गेले का, असा प्रश्न उपस्थित करत संबंधितांवर संताप व्यक्त केला.

# लंडन ते पंढरपूर ग्लोबल वारीचे नवी मुंबईत भक्तिभावाने स्वागत

**नवी मुंबई : बातमीदार**

भक्ती आणि संस्कृतीचा वैश्विक संगम नेरूळवासियाना पहावयास मिळाला. लंडन ते पंढरपूर पहिली ग्लोबल वारी २०२६' सोहळा नवी मुंबईत उत्साहात संपन्न झाला.

श्री गणेश शिव मंदिर, सारसोळे, नेरुळ (नवी मुंबई) येथे 'लंडन ते पंढरपूर पहिली ग्लोबल वारी २०२६' अंतर्गत विठ्ठल–रुक्मिणीच्या पवित्र पादुकांचे आगमन आणि दर्शन सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात झाला.

६ जून रोजी लंडनच्या विंडसरमधून निघालेली जगातील पहिली 'ग्लोबल वारी'



तब्बल ११ देश पार करत ५० दिवसांचा प्रवास करून २० जुलै रोजी पंढरपूरमध्ये दाखल होत आहे. युरोप आणि आशियातील अनेक परदेशी नागरिकही यात टाळ आणि मृदंगाच्या गजरात सहभागी झाले होते.या ऐतिहासिक आणि वैश्विक पादुकांचे स्वागत करीत नेरूळसह नवी मुंबईकर विठू माऊलीचे भक्त नतमस्तक झाले होते.

# भर पावसात वाहतूक पोलिसांचे काटेकोर नियोजन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून पनवेल उरण परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे याचा परिणाम वाहतूक कोंडीवर देखील होत आहे. न्हावा शेवा वाहतूक पोलिसांनी मुसळधार पाऊस कोसळत असताना देखील भर पावसात वाहतुकीचे नियोजन केले.



वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी सतत प्रयत्नशील असतात.जेएनपीटी येथे मोठ्या प्रमाणात जड अवजड वाहनांची रहदारी असते. या सर्व जड अवजड वाहनाचे वाहतुकीचे नियोजन वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे या स्वतः रस्त्यावर हजर राहून करत आहेत. पावसामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने रस्त्यावर उतरले आहेत.

एक महिला अधिकारी रस्त्यावर भर पावसात रस्त्यावर उतरून काम करत असल्याने नागरिकांनी कौतूक केले आहे.

# नेरुळ येथे एसआयआरसंदर्भात भाजप नेते किरीट सोमय्या यांचे मार्गदर्शन




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी नवी मुंबई जिल्हाच्या वतीने जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून शिरवणे विद्यालय व ज्यु कॉलेज, नेरुळ येथे बेलापूर मतदार संघाकरिताएस.आय.आर. अभियान बैठकीचे आयोजन रविवारी सकाळी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला एस.आय.आर. अभियानाचे प्रदेश संयोजक माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, उपमहापौर दशरथ भगत, सभागृह नेते सागर नाईक, भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील,कोकण संवादक अभिजीत पेडणेकर, आजी माजी नगरसेवक व नगरसेविका ,मंडळ अध्यक्ष, मंडळ पदाधिकारी, प्रकोष्ट, मोर्चा आजी माजी भाजपा पदाधिकारी,तसेच बेलापूर विधानसभा मधील सर्व बी.एल.ए २ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहिमेचे महाराष्ट्र राज्याचे प्रमुख माजी खासदार किरीट सोमय्या आहेत, त्यांनी आजच्या बैठकीत या मोहिमेसंदर्भात सूचना दिल्या, यावेळी किरीट सोमय्या यांनी उपस्थित बी एल ए २ तसेच पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.

# रुग्णालयाचा वर्धापन दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथे न्यू मिलेनियम हॉस्पिटलचे संचालक डॉ. व्यंकटेश माधवराव हंचाटे यांचा ४ जुलै रोजी ५१ वा वाढदिवस साजरा झाला. याप्रसंगी न्यू मिलेनियम हॉस्पिटलचा डोळे तपासणी विभाग आणि लॅबचे उद्घाटन डॉ. व्यंकटेश हंचाटे, वडील डॉ. माधवराव हंचाटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष आणि पोर्ट ट्रस्ट कामगार अंकाचे कार्यकारी संपादक मारुती विश्वासराव, नाट्यकलाकार व चित्रपट अभिनेते राम काजरोलकर यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी सानपाडा व जुईनगर येथील ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसानिमित्त छत्री वाटप करण्यात आले. वाढदिवसाच्या कार्यक्रमाला वरिष्ठ गायनिक डॉ. वैशाली हंचाटे, सीईओ डॉ. ममता पानिग्रही, सानपाडा जेष्ठ नागरिक संघाचे जगदीश एकावडे उपस्थित होते.

# नवी मुंबईत जोरदार पाऊस ; महापालिका यंत्रणा फिल्डवर

## प्रशासनाची तत्परता

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात शनिवार दि. ४ जुलै रोजी, सकाळी ८.३० ते सायं. ४.३० या कालावधीत मोठ्या प्रमाणात ११३.२० मि.मी. इतकी पर्जन्यवृष्टी झाली आहे. भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, मुंबई आणि एमएमआर क्षेत्रात मुसळधार पावसाच्या वारंवार सरी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अभियांत्रिकी, पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, उद्यान, घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी मदतकार्यासाठी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (फिल्डवर) उपस्थित राहावे असे निर्देश कालच ३ जुलै रोजी दिले होते. तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी कोणत्याही परिस्थितीत मुख्यालयात उपस्थित राहण्याचेही निर्देशित केले होते.

त्यानुसार महानगरपालिकेची सर्वच यंत्रणा सतर्कतेने क्षेत्रीय स्तरावर कार्यरत होती. ज्या सखल भागात पाणी साचण्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या तेथे पोहचून पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत होत्या. आवश्यक तेथे पाणी उपसा पंपांची संख्या वाढविण्यात आली. आयुक्त सर्वांच्या संपर्कात राहून सर्व स्थितीवर नियंत्रण राहील याकडे लक्ष ठेवून होते. महापौर सुजाता पाटील यांनीही स्वतः फिल्डवर जात ज्या ठिकाणी पाणी साचले आहे त्या ठिकाणी यंत्रणांना तत्पर कार्यवाही करण्यासाठी निर्देशित केले.

दुपारी २.५० वा., ४.२६ मीटर उंचीची भरती होती हे लक्षात घेऊन नवी मुंबई हे समुद्रसपाटीपासून खाली वसलेले शहर असल्याने भरतीच्या वेळी मुसळधार पाऊस असल्यास सखल भागांमध्ये पाणी साचते हे लक्षात घेऊन आपत्कालीन मदतकार्य यंत्रणा सज्ज होती. आता मध्यरात्री २.५२ वाजता ३.६० मीटर उंचीची भरती असून यंत्रणेस सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर कालावधीत आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या घटनांनुसार आतापर्यंत १० झाडे पडणे, १ झाडाची फांदी पडणे तसेच ११ ठिकाणी पाणी साचण्याच्या घटनांची नोंद झाली



असून संबंधित विभाग कार्यालय, अग्निशमन विभाग व इतर यंत्रणांकडून तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवस ठाणे जिल्ह्यासाठी 'रेड अलर्ट' जारी केला असून अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या असून नागरिकांनीही आवश्यक खबरदारी घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

यादृष्टीने नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना :–

अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे.सखल भाग, समुद्रकिनारा, खाडी परिसर व पाणी साचलेल्या ठिकाणी जाणे टाळावे.मोठी झाडे, होर्डिंग्ज, जीर्ण इमारती व विद्युत खांबांच्या परिसरात थांबू नये. मुसळधार पावसादरम्यान वाहन चालविताना विशेष दक्षता घ्यावी व पाणी साचलेल्या रस्त्यांवरून वाहन चालविणे टाळावे.

विद्युत तारा तुटलेल्या किंवा धोकादायक परिस्थिती आढळल्यास तत्काळ संबंधित विभागास व आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षास कळवावे. प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करून अफवांवर विश्वास ठेवू नये.

कोणत्याही स्वरूपाच्या आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नवी मुंबई आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन आयुक्त कैलास शिंदे यांनी केले आहे.

# 'एन्व्हायरन्मेंट थ्रू माय लेन्स' फोटोग्राफी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशन व माय भारत–रायगड, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एन्व्हायरन्मेंट थ्रू माय लेन्स' या राष्ट्रीय स्तरावरील फोटोग्राफी स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आज पनवेल येथील इन्फिनिटी फाउंडेशनच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून डी. डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे उपस्थित होत्या. त्यांनी विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह, पदक व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सीमा कांबळे म्हणाल्या, "पर्यावरण संवर्धन



ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. छायाचित्रणासारख्या सर्जनशील माध्यमातून निसर्गाचे सौंदर्य, पर्यावरणीय समस्या आणि संवर्धनाची गरज प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविता येते. 'एन्व्हायरन्मेंट थ्रू माय लेन्स'सारखे उपक्रम तरुणांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच त्यांची सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकीही दृढ करतात."

स्पर्धेमध्ये मोबाईल फोटोग्राफी, कॅमेरा फोटोग्राफी आणि आंतरराज्य (Inter State) अशा तीन गटांमध्ये विजेत्यांची निवड करण्यात आली.

**मोबाईल फोटोग्राफी गट**

- प्रथम : लॅव्हनिश देवेंद्रन
- द्वितीय : अनाया देटके
- तृतीय : सिद्धांत जाधव

**कॅमेरा फोटोग्राफी गट**

- प्रथम : पलक पालांडे
- द्वितीय : दादाला तेजा कृष्णा
- तृतीय : देवांश पाटील

**आंतरराज्य विशेष गट**


- निपुण राज (नवी दिल्ली)
- प्रसाद के. एन. (त्रिशूर, केरळ)
- धारुम बिस्वास (पश्चिम बंगाल)
- अरुण चोक्कलिंगम (पेरंबलूर, तामिळनाडू)
- अमर कुमार (दिल्ली)

एकूण ११ विजेत्या स्पर्धकांचा सन्मान करण्यात आला.

या उपक्रमाद्वारे छायाचित्रणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुब आकुला यांनी सांगितले. या कार्यक्रमास फाउंडेशनचे पदाधिकारी, स्वयंसेवक, स्पर्धक तसेच पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# मुरुड तालुक्यात तुफान पाऊस

## ठिकठिकाणी पाणी साचले; भातशेतीही गेली पाण्याखाली

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड परिसरात गेले सहा दिवस सतत पाऊस पडत आहे. रात्रीदेखील मुसळधार पाऊस पडल्याने सर्वच ठिकाणी पाणीच पाणी झाले होते. रविवारी (दि.५) सकाळी मुरुड तहसील कार्यालयाकडून पावसाची नोंद तपासण्यात आली तेव्हा २५८ मिलीमीटर विक्रमी पावसाची नोंद झाली, तर आतापर्यंत एकूण १२४२ पाऊस पडला आहे.

फक्त एका दिवसात विक्रमी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सोसाट्याचा वारा व मुसळधार पाऊस यामुळे विविध ठिकाणच्या रस्त्यावर पाणी साचले. वाहतूक विस्कळीत झाली होती.

प्रचंड प्रमाणात पावसाचे पाणी पडल्याने शेतामध्येसुद्धा पाणी साचले. मुरुड, खारआंबोली, शीघ्रे, आगरदांडा, गारंबी परिसरातील भातशेती पाण्याखाली गेली आहे. भातशेतीचे राब उशिरा लावल्याने हे राब पाण्याने वाहून जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे.

दुसरीकडे समुद्राला मोठे उधाण असल्याने जंजिरा किल्ल्यासमोर उंच लता आढळत होत्या. खोरा बंदरात लाटांचे तांडव पाहण्यासाठी पर्यटक व नागरिक हजेरी लावत होते.

सतत पाऊस असल्यामुळे बाजरपेठात पाणी साचले. प्रशासनाने गटार सफाई केली खरी, पण ती अर्धवट झाल्याने अनेक ठिकाणी पाणी साचले. यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था एसटी बसलासुद्धा अडसर निर्माण झाला, कारण जागोजागी पाऊस आहेत.

जोरदार पावसामुळे समुद्र किनारीसुद्धा शुकशुकाट होता. या पडलेल्या पावसामुळे शेतकरी चिंतेत आहे, कारण शेतामध्ये राब वर आले असून त्याची झपाट्याने वाढ होत आहे. ते वाहून जाण्याची भीती आहे. येत्या काही दिवसात पेरणीला सुरुवात होणार आहे.

मुरुड तालुक्यात आतापर्यंत एकूण पाऊस १२४२ मिलीमीटर पाऊस पडला असून सर्वात जास्त रविवारी सकाळी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

मुसळधार पावसात सुद्धा कोणतीही अप्रिय घटना घडलेली नाही, मात्र काही ठिकाणी रस्त्यावर झाडे पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली.

# पेब किल्ल्यावर ट्रेकर जखमी; रेस्क्यू टीमकडून सुखरूप सुटका

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळजवळील पेब (विकटगड) किल्ल्यावर ट्रेकिंगदरम्यान दरड कोसळून कौस्तुभ परब (वय ३१, रा. ठाणे) जखमी झाले. दरड कोसळताना मोठा दगड पाठीवर पडल्याने त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला आणि ते किल्ल्यावरच अडकून पडले होते. फणसवाडी येथील शिवगर्जना रेस्क्यू टीमने त्यांना सुरक्षितरित्या किल्ल्यावरून खाली उतरविले.



ठाणे येथून १२ जणांचा एक ट्रेकिंग ग्रुप शनिवारी पेब (विकटगड) किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी आला होता. ट्रेकदरम्यान अचानक दरड कोसळल्याने हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिसांनी तातडीने फणसवाडी येथील शिवगर्जना रेस्क्यू टीमला पाचारण केले. त्यानंतर रेस्क्यू टीम, नेरळ पोलीस तसेच स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले.

ममदापूरवाडी व फणसवाडी येथील युवकांच्या मदतीने जखमी कौस्तुभ परब यांना अत्यंत सुरक्षितरित्या किल्ल्यावरून खाली उतरविण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना रायगड जिल्ह्यातील डिकसळ येथील रुग्णालयात पाठविण्यात आले.



# रोह्यात मुसळधार पाऊस; कुंडलिका व अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली, नालेही तुडुंब!

**रोहा : प्रतिनिधी**

हवामान खात्याने रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट दिल्यानंतर रोहा तालुक्यात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गेली गेली चार-पाच दिवस पावसाने मुक्काम ठोकला असून शनिवारी सकाळपासूनच पावसाने जोरदार सुरुवात केली आहे. मुसळधार पाऊस शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पडला आहे.



तालुक्यात मुसळधार पाऊस पडल्याने डोंगरदऱ्यातून वाहत येणारे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात वाहत येत असल्याने तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदी व नागोठणे येथील अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. कुंडलिका व अंबा नदी किनारी असलेल्या गावांना पाण्यापासून धोका असल्याने तेथील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केला आहे.

रोहा शहरासह मेढा, यशवंतखार, चणेरा, घोसाळे, भालगाव, धाटाव, कोलाड, सुतारवाडी, खांब, देवकान्हे, धामणसई, एनघर, नागोठणे, आंबेघर आदी विभागात जोरदार पाऊस पडला आहे.

# घोडिवली-अंजरूण पुलावरून पाणी वाहू लागले; दोन्ही बाजूंनी रहदारी बंद

**चौक : प्रतिनिधी**

घोडिवली ते अंजरूण पुलावरून पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे नागरिकांना सध्या पुलावरून न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरून घोडीवली गावाकडे व पुढे जाणारा रस्ता आहे. याच मार्गावर एक संरक्षण कठडा नसलेला पूल आहे. घोडिवली ते अंजरूण या पुलाला संरक्षण कठडा नाही. आता या पुलावरून पाणी वाहून जात आहे. याबाबत खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना माहिती देताच त्यांनी बॅरीकेट व पोलीस पाठवून दोन्ही बाजूंनी पूल रहदारीसाठी बंद केला.

अशा परिस्थिती या मार्गाला खोपोली-कर्जत व्हाया पळसदरी मार्गाचा पर्याय उपलब्ध असून नागरिकांनी त्याचा वापर करावा, असे आवाहन पोलीस, सामाजिक कार्यकर्ते किरण हाडप, पत्रकार नवज्योत पिंगळे, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांनी केले आहे.

या पुलावरून गेल्या वर्षी एक नागरिक पडून वाहून गेला होता. त्यामुळे पुलाला संरक्षण कठडा करणे गरजेचे आहे. या संदर्भात प्रशासनाने पावले उचलून कार्यवाही करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.



**मुरुड : येथील बाजारात दमदार पावसाने पाणी साचले. या पाण्यात बच्चेकंपनीने रविवारच्या सुट्टीचा आनंद घेतला.** (छाया : सुधीर नाझरे)

# चेंढरेत आज हातावरील नारळफोडी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ, अलिबाग-रायगडच्या ६८व्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी (दि. ६) कोकण विभागीय स्तरावरील भव्य हातावरील नारळफोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा भंडारी भवन, स्व. गोविंद बाबू नार्वेकर सभागृह, श्रीबागजवळ, चेंढरे (अलिबाग) येथे दुपारी २ वाजता सुरू होणार असून स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

स्पर्धेत कोकण विभागातील मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भंडारी समाजातील स्पर्धक सहभागी होणार आहेत. स्पर्धकांना आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली असून प्रथम क्रमांकासाठी फ्रिज (डबल डोअर), द्वितीय क्रमांकासाठी वॉशिंग मशीन, तृतीय क्रमांकासाठी स्मार्ट टीव्ही आणि चतुर्थ क्रमांकासाठी सायकल अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक संघात ६४ सदस्यांचा समावेश असणे आवश्यक आहे. स्पर्धकांना जात प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाणार असून प्रत्येक स्पर्धकाने पाच नारळ (पूर्ण सुकलेले) आणणे बंधनकारक आहे. प्रत्येक स्पर्धकाला एकदाच संधी दिली जाईल. पंचांचा निर्णय अंतिम राहणार असून स्पर्धेचे सर्व नियम व अटी आयोजकांच्या अखत्यारीत असतील.

संस्थेचे प्रभारी अध्यक्ष कमळाकर पडवळ यांनी भंडारी समाजातील सर्व बांधवांनी तसेच नागरिकांनी या आगळ्यावेगळ्या स्पर्धेला व वर्धापन दिन सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे. स्पर्धेच्या आयोजनासाठी संतोष मोरे आणि राजेंद्र बांदिवडेकर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही आयोजकांनी केले आहे.

# अंजुमन इस्लाम जंजिरा टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जफर शेखानी मेमोरियल टेक्निकल इन्स्टिट्यूट, मुरुड येथे संस्थेचे सचिव हिफजुररेहमान शौकत अली नझीर यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



'आजचा हा पारितोषिक वितरण सोहळा केवळ विद्यार्थ्यांच्या यशाचा उत्सव नसून त्यांच्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीचा गौरव करणारा क्षण आहे. आपल्या संस्थेचे ध्येय केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित नाही, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे आहे. तांत्रिक ज्ञानासोबतच नैतिक मूल्ये, शिस्त आणि कौशल्य यांचा संगम घडवून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा आमचा प्रयत्न आहे', असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष हिफजुररेहमान नझीर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून युनिव्हर्सल एज्युकेशन अॅण्ड वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष दिलावर महाडकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, तांत्रिक शिक्षणाबरोबरच शिस्त, कौशल्य आणि प्रामाणिकपणा या गुणांनीच खरे यश मिळते. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, केवळ नोकरीसाठी नव्हे, तर समाजासाठी उपयुक्त नागरिक बनण्याचे ध्येय ठेवा.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये विविध ट्रेडमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून अल्ताफ हुसेन दांडेकर, मतीन मुर्तुजा हसवारे, मोहम्मद साजिद एम. एस. उल्डे, सलमान शौकत घलटे, अंजुमन इस्लाम जंजिरा टेक्निकल इन्स्टिट्यूटचे सदस्य युसूफ अर्जबेगी, अंजुमन डिग्री कॉलेजचे सदस्य इम्रान मलिक, प्राचार्य डॉ. साजिद शेख, हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य वसीम सातारेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अंजुमन इस्लाम जंजिरा टेक्निकल इन्स्टिट्यूटचे चेअरमन समीर दौनाक यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य इफ्तिखार ए.एच. घलटे यांच्या नेतृत्वाखाली संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असल्याचे नमूद करण्यात आले.

# आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद शिक्षण मंडळाच्या शहरातील विविध ठिकाणी पाच मराठी शाळा असून या शाळेतील विद्यार्थ्यांना आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त व प्रेरणेतून मुरुड शहर शिंदे शिवसेनेकडून शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

मुरूड जंजिरा नगरपरिषद शिक्षण मंडळाची शाळा क्रमांक ३मध्ये नगरपरिषदेचे शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत व अन्य मान्यवरांच्या यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटत करण्यात आले.



या कार्यक्रमास पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, पर्यटन विकास नियोजन सभापती रूपेश रणदिवे, नगरसेवक मनिष विरुकुड, नगरसेविका अंकीता गुरव, प्रणव दिवेकर, मुख्याध्यापिका कल्पना पेणकर, शिक्षक महेंद्रकुमार हावरे, राकेश राखडे, शिक्षिकासंजना म्हात्रे, आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विरेंद्र भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत आहोत. शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शालेय साहित्य ही विद्यार्थ्यांची अत्यावश्यक गरज असते.

आज विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आणि इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी अधिक उत्साह निर्माण होईल आणि त्यांना आपल्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा मला विश्वास वाटतो, असेही ते म्हणाले.

उपस्थित अन्य मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना मन लावून शिक्षण घेण्याचा सल्ला देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षकांनी आभार मानले.

# फ्रान्सची उपांत्यपूर्व फेरीत धडक!

**फिलाडेल्फिया : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकाच्या प्री-क्वार्टर फायनल (राऊंड ऑफ १६) सामन्यात फ्रान्सने पॅराग्वेवर १-० असा निसटता विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. फिलाडेल्फिया येथे झालेल्या या सामन्यात किलियन एम्बाप्पेने पेनल्टीवर केलेला गोल निर्णायक ठरला.

सामन्यात फ्रान्सचा विंगर देझिरे डुए याला पॅराग्वेच्या बचावपटूंनी पाडल्यानंतर सुरुवातीला पंचांनी पेनल्टी दिली नव्हती, मात्र व्हिडीओ सहाय्यक पंच प्रणाली (व्हीएआर)द्वारे निर्णयाचा आढावा घेतल्यानंतर फ्रान्सला पेनल्टी बहाल करण्यात आली. त्यानंतर एम्बाप्पेने अचूक गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली.

एम्बाप्पेसाठी हा सामना चढ-उतारांनी भरलेला ठरला. त्याने एक सोपी गोलची संधी दवडली तसेच पॅराग्वेच्या खेळाडूंशी त्याचे दोनदा वादही



झाले. पहिल्या सत्रात पॅराग्वेने ५-४-१ या बचावात्मक फॉर्मेशनमध्ये खेळ करत फ्रान्सला गोल करण्यापासून रोखले. त्यामुळे फ्रान्सला सुरुवातीला अपेक्षित वर्चस्व गाजवता आले नाही.

सुमारे ४० अंश सेल्सिअस तापमानात झालेल्या या सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंना उष्णतेचा मोठा सामना करावा लागला. अशातच सामन्यामध्ये ७० मिनिटांपर्यंत दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पहायला मिळाली. यादरम्यान अनेक वेळा खेळाडूंमध्ये वाद होऊन ते एकमेकांना भिडल्याचे दिसून आले.

आता उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सची लढत मोरोक्कोविरुद्ध होणार आहे. २०२२च्या फिफा विश्वचषक उपांत्य फेरीतील या दोन संघांतील सामना पुन्हा एकदा रंगणार असल्याने फुटबॉल चाहत्यांचे लक्ष या सामन्याकडे लागले आहे.

# पेनल्टी शूटआऊटमध्ये इजिप्तची सरशी

**डॅलस : वृत्तसंस्था**

अगदी पेनल्टी शूटआऊटपर्यंत रंगलेल्या रोमांचक लढतीत इजिप्तने ऑस्ट्रेलियाचा संघर्ष अखेर ४-२ असा मोडीत काढला आणि या विजयासह 'राऊंड ऑफ १६' (उपउपांत्यपूर्व फेरी)मध्ये प्रवेश केला. डॅलस येथील या सामन्यात निर्धारित ९० मिनिटे आणि त्यानंतरची अतिरिक्त वेळ संपली, तरी दोन्ही संघ १-१ अशा बरोबरीत होते. अखेर पेनल्टी शूटआऊटमध्ये इजिप्तने ऑस्ट्रेलियाचे पॅकअप केले.

पूर्वार्धात इजिप्तने पूर्ण नियंत्रण ठेवले. सुरुवातीच्या टप्प्यातच इमाम अशुअरने अप्रतिम हेडर करत गोल केला आणि इजिप्तला १-० अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. पुनरागमन करण्यासाठी धडपडणाऱ्या ऑस्ट्रेलियाला इजिप्तच्या मोहम्मद हानीच्या एका चुकीमुळे बरोबरी साधता आली. हॅनीच्या डोक्याला लागून चेंडू त्यांच्याच गोलपोस्टमध्ये गेला आणि ऑस्ट्रेलियाला १-१ अशी बरोबरी मिळाली. यामुळे या लढतीत पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. त्यात इजिप्तने ४-२ अशी बाजी मारली. आता पुढच्या फेरीत इजिप्तचा सामना बलाढ्य अर्जेंटिनाशी होणार आहे.



# मोरोक्कोचा कॅनडावर दणदणीत विजय

## अझेदिन ओउनाहीचा दुहेरी गोल

**ह्यूस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेतील राउंड ऑफ १६ सामन्यात मोरोक्कोने दमदार खेळ करत कॅनडाचा ३-० असा पराभव केला आणि क्वार्टर फायनलमध्ये शानदार प्रवेश केला. ह्यूस्टन येथे झालेल्या या सामन्यात दुसऱ्या हाफमध्ये मोरोक्कोने गोलांचा पाऊस पाडत विजयावर शिक्कामोर्तब केले.

मोरोक्कोसाठी अझेदिन ओउनाही याने दुसऱ्या हाफमध्ये दोन गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर स्टॉपेज टाइममध्ये मैदानात उतरलेल्या सुफियान रहिमीने तिसरा गोल झळकावत कॅनडाच्या पुनरागमनाच्या सर्व आशा संपुष्टात आणल्या.



या सामन्यात ब्राहिम डियाझ याने उत्कृष्ट खेळ करत ओउनाहीच्या दुसऱ्या गोलसह रहिमीच्या गोलसाठी महत्त्वाची असिस्ट केली. रहिमीला पहिल्या हाफमध्ये दुखापतग्रस्त झालेल्या इस्माईल सैबारी यांच्या जागी बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरवण्यात आले होते. स्पर्धेतील अव्वल गोलस्कोरर असलेल्या सैबारीच्या दुखापतीनंतरही मोरोक्कोने दमदार खेळ करत मोठा विजय मिळवला.

या विजयासह मोरोक्को आता क्वार्टर फायनलमध्ये दाखल झाला असून पुढील फेरीत त्यांचा सामना फ्रान्स किंवा पॅराग्वे यांच्यापैकी विजेत्या संघाशी होण्याची शक्यता आहे.

# पदार्पणानंतर वैभव सूर्यवंशीची भावनिक पोस्ट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टरच्या मैदानातील दुसऱ्या टी-२० सामन्यात वैभव सूर्यवंशीनं इतिहास रचला. पदार्पणाची कॅप मिळताच टीम इंडियाकडून सर्वात कमी वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याचा विक्रम त्याच्या नावे झाला. पहिल्याच सामन्यात जोफ्रा आर्चर आणि जोश टंग यांना उत्तुंग षटकार मारत त्याने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये धमाका करण्यासाठी सज्ज असल्याचा शड्डू ठोकला. आता वैभव सूर्यवंशीची खास पोस्ट व्हायरल होताना दिसत आहे.

आयपीएलमधील दमदार कामगिरीनंतर वैभव सूर्यवंशीच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची सर्वांनाच उत्सुकता होती. इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात



त्याला अखेर टीम इंडियाची पदार्पणाची कॅप मिळाली. पहिल्या आंतरराष्ट्रीय सामन्यात वैभवने १० चेंडूत १४ धावा केल्या. भारताला या सामन्यात चार विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला, तरी वैभवच्या आत्मविश्वासपूर्ण खेळीचे सर्वत्र कौतुक होत आहे, कारण पदार्पणासह वैभव सूर्यवंशीने मोठा इतिहास रचला.

वैभवने महान फलंदाज सचिन तेंडुलकर आणि महिला क्रिकेटपटू शेफाली वर्मा यांचा विक्रम मोडत भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा सर्वात युवा खेळाडू होण्याचा मान पटकावला.

पदार्पणानंतर वैभवने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर टीम इंडियाच्या जर्सीतील फोटो शेअर करत भावनिक संदेश लिहिला. "तुमचे सर्व मेसेज पाहून माझं मन भरून आलं. नेहमी इतकं प्रेम आणि पाठिंबा दिल्याबद्दल माझ्या सर्व शुभेच्छुकांचे आणि वरिष्ठांचे मनापासून आभार. मला माझ्या देशासाठी खेळण्याची संधी मिळाली, यासाठी मी खूप कृतज्ञ आहे. मी जेव्हा जेव्हा मैदानावर उतरेन, तेव्हा माझ्या संघासाठी सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करेन. प्रत्येक गोष्टीसाठी तुमचे मनःपूर्वक धन्यवाद."

वैभवच्या या भावनिक पोस्टला चाहत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. अनेकांनी त्याचे आंतरराष्ट्रीय पदार्पणाबद्दल अभिनंदन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय क्रिकेटला भविष्यातील मोठा स्टार मिळाल्याची भावना अनेक चाहत्यांनी व्यक्त केली आहे.

# 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत एम्बाप्पेची मेस्सीशी बरोबरी

**ह्यूस्टन : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या राउंड ऑफ १६ फेरीत फ्रान्सने पॅराग्वेचा १-० असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. दोन्ही संघातील चुरशीच्या लढतीत पेनल्टीचा फायदा उचलत किलियन एम्बापेने फ्रान्ससाठी निर्णायक गोल डागला. या गोलसह त्याने यंदाच्या हंगामात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत मेस्सीची बरोबरीचा डावही साधला आहे.

फिलाडेल्फियामधील लिंकन फायनान्शियल फील्डवर रंगलेल्या सामन्यात पॅराग्वेने फ्रान्सच्या स्टार खेळाडूंना बराच वेळ रोखून धरले. बचावात्मक रणनीती आणि आक्रमक खेळामुळे फ्रान्सला नेहमीप्रमाणे मुक्तपणे खेळता आले नाही. पहिला हाफ गोलशून्या



राहिल्यावर अखेर ७०व्या मिनिटाला फ्रान्सला आघाडी घेतली. डिझिरे डुए याला बॉक्समध्ये डिएगो गोमेझने धक्का मारला. रेफरीने व्हीएआर तपासणीनंतर पेनल्टी फ्रान्सला पेनल्टी दिली. एम्बाप्पेने कोणतीही चूक न करता चेंडू जाळ्यात धाडत फ्रान्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

या गोलसह किलियन एम्बाप्पेने वर्ल्डकप स्पर्धेत सातवा गोल नोंदवत अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीची बरोबरीचा डाव साधला. दोघेही प्रत्येकी सात गोलसह संयुक्तरित्या अव्वलस्थानावर आहेत. गत हंगामात फायनलपर्यंत या दोघांमध्ये गोल्डन बूटसाठी तगडी शर्यत पहायला मिळाली होती. अर्जेंटिनाने अंतिम सामना जिंकला अन् उप विजेता ठरलेल्या फ्रान्सच्या एम्बापेने गोल्डन सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला होता. याशिवाय एम्बाप्पेच्या वर्ल्डकपमधील एकूण गोलांची संख्या १९ झाली आहे. विशेष म्हणजे त्याने केवळ १९ सामन्यांत हा पल्ला गाठला आहे. आता तो मेस्सीच्या ऑल टाईम रेकॉर्डपासून एक गोल दूर आहे.

# पराभवानंतर जर्मनी संघाच्या मॅनेजरचा राजीनामा

**बर्लिन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीतील मानहानीकारक आणि धक्कादायक पराभवाचा परिणाम जर्मन फुटबॉल संघावर जाणवू लागला आहे. चार वेळा विश्वविजेते ठरलेल्या जर्मनीचे व्यवस्थापक ज्युलियन नागेल्समन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

३२ संघांच्या फेरीत पॅराग्वेकडून झालेल्या पराभवानंतर आणि स्पर्धेतून लवकर बाहेर पडल्यानंतर जर्मन फुटबॉल फेडरेशन (डीएफबी) सोबत झालेल्या बैठकीनंतर नागेल्समन यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला. ३८ वर्षीय नागेल्समन यांचा करार मूळतः २०२८च्या युएफा युरोपियन चॅम्पियनशिपपर्यंत होता, परंतु या दारुण पराभवाने त्यांचा जवळपास तीन वर्षांचा कार्यकाळ अचानक संपुष्टात आणला. जर्मन फुटबॉल असोसिएशनने साडेतीन तासांची बैठक बोलावली. या बैठकीत डीएफबीने नागेल्समन यांना स्पष्टपणे पदत्याग करण्याचा सल्ला दिला, जो त्यांनी स्वीकारला.






# हार्दिक पांड्याचा जबरा फॅन!

## भेटण्यासाठी केला २००० किमीचा सायकल प्रवास

**मुंबई : प्रतिनिधी**

दुखापतीमुळे भारत विरुद्ध अफगाणिस्तान मालिका आणि इंग्लंड दौऱ्याला मुकलेला टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. त्याच्या एका जबरा फॅनने म्हणजेच दीपक कुमारने बंगळुरू येथे हार्दिकला भेटण्यासाठी तब्बल १२ दिवसांत २००० किमीचा सायकल प्रवास केला. हार्दिकची गर्लफ्रेंड महिका शर्मा हिने ही खास भेट घडवून आणली असून याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.



भारत आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या वनडे मालिकेसाठी हार्दिक पांड्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आला होता. पण दुखापतग्रस्त असल्यामुळे तो या मालिकेत खेळू शकला नव्हता. ही मालिका झाल्यानंतर भारतीय खेळाडू इंग्लंड दौऱ्यावर रवाना झाले आहेत, पण हार्दिक पांड्या या संघाचा भाग नाही. मैदानावर आपल्या तुफान फटकेबाजीसाठी ओळखला जाणारा हार्दिक वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. त्याच्या एका जबरा फॅनने आपल्या आवडत्या खेळाडूची भेट घेण्यासाठी सलग १२ दिवस सायकल चालवली आणि २००० किमी इतका प्रवास केला.

हार्दिक आणि त्याच्या जबरा फॅनची भेट हार्दिकची गर्लफ्रेंड महिका शर्माने घडवून आणली. फॅन दीपक कुमारने हार्दिकला भेटण्याची इच्छा व्यक्त करणारे व्हिडीओ आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर केले होते. महिकाने दीपक कुमारच्या व्हिडीओवर कमेंट करत लिहिले होते की, "बंगळुरूला ये मी तुझी भेट करून देते." महिकाने दिलेला शब्द पाळला, दीपक बंगळुरूला आल्यानंतर हार्दिकने त्याची भेट घेतली आणि खास गिफ्ट दिले.

**हार्दिकनेही दिले खास गिफ्ट**

फॅन दीपक कुमारने हार्दिकला जगन्नाथाची मूर्ती दिली. यासह त्याचा सत्कार केला. हार्दिकनेही त्याला रिटर्न गिफ्ट म्हणून चॅम्पियन्स ट्रॉफीची ऑटोग्राफ केलेली जर्सी दिली. यासह सोशल मीडियावर असा दावा केला जातोय की, हार्दिकने त्याला १.५ लाख रुपये आणि विराट कोहलीने नुकताच लॉन्च केलेले वन ८चे शूज गिफ्ट म्हणून दिले, पण हा दावा खरा आहे की खोटा याबाबत कुठलीही माहिती समोर आलेली नाही





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com